दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २६९ I रविवार १२ जुलै २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## कुंडलिनी आणि आरोग्य...



'सहजयोग'
भाग १०६

एकदा तुम्ही सहजयोगामध्ये जर साक्षात्कारी पदाला प्राप्त झालात, तर तुम्हाला औषध, डॉक्टर वगैरे काहीही नको आणि सगळे रोग मानसिक, किंवा शारीरिक रोग नेहमीसाठी निघून जातात. सहजयोगासाठी तुम्हाला काही पैसे द्यायला नकोत. तुम्हाला त्याच्यासाठी काही विशेष मेहनत करायची नाही. जसं एखादं बी स्वत: उपजतं तसं तुमच्यात बसलेलं बीज अंकुरतं. तुमच्यामध्ये तो अंकुर आहे आणि त्या अंकुराला विद्वानांनी कुंडलिनी हे नाव दिलेले आहे. जसं प्रत्येक बी मध्ये अंकुर असतो तसं तुमच्या प्रत्येकामध्ये ते अंकुर आहे. बी आपोआपच उगवतं, तसं तुमच्यात असलेला परमेश्वरानी ठेवलेला जो अंकुर आहे तो आपोआपच वर येतो. पण एवढंच आहे, जसा एखादा दीप तुम्ही सजवून ठेवलेला असला तरी तो आपोआप पेटत नाही त्याला एक पेटलेला दीप जवळ आणायला पाहिजे, त्याप्रमाणे सहजयोगातसुद्धा जो दीप पेटलेला आहे तोच न पेटलेल्या दिव्यांना पेटवू शकतो. कुंडलिनी ही तुमची आई आहे. ती जन्मोजन्मी तुमच्या बरोबर जन्मते. ती तुमच्यामध्ये वास करते आणि आई किती पवित्र वस्तू आहे हे आपल्याला माहीत आहे पण ही नुसती पवित्रता तुमची आई आहे आणि ती त्या क्षणाची वाट बघत असते ज्या वेळेला अशी कोणी तरी व्यक्ती जी त्या प्रेमाने ओतप्रोत असेल, ती समोर आली की कुंडलिनी आपोआप उभी होते आणि तुम्हाला त्याचा साक्षात्कार घडतो. २५ मार्च १९७७ कळवा. अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# श्रीरामपुरात भरदिवसा हॉटेल व्यावसायिकाची हत्या

## जेवणाच्या किरकोळ वादातून नशेबाज टोळीचा हल्ला; ३ आरोपी ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरातील नेवासा रोडवरील प्रसिद्ध 'हॉटेल लक्ष्मीनारायण पॅलेस'मध्ये शनिवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास हत्याकांड घडले. जेवणाच्या किरकोळ वादाचे रूपांतर मोठ्या हाणामारीत होऊन, हॉटेल व्यावसायिक आकाश शेखर दुबैय्या (वय ३५) यांचा धारदार शस्त्राने आणि काचेच्या टिपॉयने डोक्यात वार करून निर्घृण खून करण्यात आला. आकाश हे प्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक माजी नगरसेवक शेखर दुबैय्या यांचे चिरंजीव आहेत. या भीषण हल्ल्यात शेखर दुबैय्या यांच्यासह पुतणे कुणाल कैलास दुबैय्या हेदेखील गंभीर जखमी झाले आहेत.



या थरारक हत्याकांडामुळे संपूर्ण श्रीरामपूर शहर आणि व्यापारी वर्गात प्रचंड भीती व दहशतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हॉटेलचे मालक शेखर दुबैय्या हे घटनेच्या काही वेळ आधीच नाशिकवरून आले होते. हॉटेलमध्ये वाद सुरू झाल्याचे पाहताच त्यांनी हल्लेखोरांना समजवण्याचा आणि वाद मिटवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, हल्लेखोर ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. त्यांच्यात झालेल्या जोरदार झटापटीदरम्यान हल्लेखोरांनी हॉटेलमधील काचेचा टिपॉय आकाश दुबैय्या यांच्या डोक्यात मारला आणि धारदार शस्त्राने वार केले. यामुळे हॉटेल परिसरात एकच गोंधळ आणि पळापळ निर्माण झाली.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आकाश यांना तातडीने साखर कामगार रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र जगधने यांनी घोषित केले. घटनेची माहिती मिळताच साखर कामगार रुग्णालयाच्या परिसरात नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत तीन संशयित आरोपींना ताब्यात घेतले.

ओंकार डफाळ (रा. खिलारी वस्ती, श्रीरामपूर), सूरज जाधव (रा. खिलारी वस्ती, श्रीरामपूर), यश जाधव (रा. खिलारी वस्ती, श्रीरामपूर) अशी आरोपींची नावे असून एकावर साखर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. यातील एक आरोपी घटनास्थळी थांबून होता.

विशेष म्हणजे, हे हल्लेखोरांमधील काही



तरुण मागील काही दिवसांपासून याच हॉटेलमध्ये लॉजिंगला राहत होते.

घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, डीवायएसपी जगन्नाथ भवर, पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांनी साखर कामगार रुग्णालयाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी स्वतः घटनास्थळाची पाहणी करत तपास पथकांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. हॉटेलमधील आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे विविध पोलीस पथके या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

### आरोपी कोणत्या नशेत?

हल्लेखोरांनी कोणतीतरी नशा केली होती आणि नशेच्या भरातच त्यांनी हे कृत्य केल्याचे बोलले जात आहे. जर नशा केली असेल तर बंदी असताना ड्रग्स पदार्थ येतात कुठून अन् भेटतात कसे? प्रश्न श्रीरामपूरकराच्या समोर उभा राहिलेला आहेत.

### आजपासून श्रीरामपूर बेमुदत बंद

भरदिवसा आणि गजबजलेल्या भागात घडलेल्या या घटनेमुळे श्रीरामपूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. व्यापारी वर्गात मोठी दहशत निर्माण झाली असून, या प्रकरणातील दोषींवर आणि त्यांच्या पाठीशी असणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आज रविवारपासून श्रीरामपूर बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय मर्चंट असोसिएशन मध्ये झालेल्या बैठकीत घेण्यात आला. आमदार हेमंत ओगले यांनी बंदचा निर्णय जाहीर केला. दरम्यान कायदा सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे आज श्रीरामपूरला भेट देणार असल्याचे भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

### शहरातील अट्टल गुन्हेगाराचा आरोपी हा मेव्हणा?

आरोपी शहरातील एका स्थानिक गुन्हेगारी टोळीशी संबंधित असून, नुकत्याच पोलिसांच्या जाळ्यात अडकलेल्या एका अट्टल गुन्हेगाराचा तो मेव्हणा असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. मात्र, पोलिसांनी याला अद्याप अधिकृत दुजोरा दिलेला नाही.

# 'आम्ही तुम्हाला सर्वांसमोर उघडे पाडू...'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारवर तीव्र टीका केली असून, सरकारला सार्वजनिकरित्या 'उघड' करण्याचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र सरकार जामीन अर्जांना तीव्र विरोध करते, परंतु फौजदारी खटल्यांना गती देण्यात अपयशी ठरते, असे न्यायालयाने म्हटले आहे.

**न्यायालयाची महाराष्ट्र सरकारला 'सर्वोच्च' फटकार!**

न्यायमूर्ती हसनुद्दीन अमानुल्ला आणि शील नागू यांचे खंडपीठ एका परदेशी नागरिकाने दाखल केलेल्या जामीन अर्जावर सुनावणी करत होते. खटल्याला गती देण्यासाठी कोणतीही पावले उचलत नाही.

**■ सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, त्याला ५३ वेळा न्यायालयात हजर करण्यात आले नाही. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, आरोपीला सत्र न्यायालयात हजर करण्यात महाराष्ट्राचे अपयश ही एक गंभीर चूक आहे. आरोपीच्या जलद सुनावणीच्या मूलभूत हक्कावरील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ देत खंडपीठाने म्हटले, आम्हाला लाज वाटते. चार वर्षांत ३४ पैकी केवळ दोन साक्षीदारांची साक्ष झाली आहे. ही बाब काही काळापासून न्यायालयासाठी चिंतेची आहे.**

खंडपीठ म्हणाले, आमच्याकडे महाराष्ट्रातून दररोज अशी प्रकरणे येतात. तुम्ही जामिनाला तीव्र विरोध करता, पण खटल्याला गती देण्यासाठी कोणतीही पावले उचलत नाही. जेव्हा आम्ही प्रकरणाचा तपास करतो, तेव्हा पुरावे कमकुवत असल्याचे दिसून येते. आम्ही तुम्हाला (सरकारला) सार्वजनिकरित्या उघड करू. अपहरण आणि खून प्रकरणात अटक केलेल्या आरोपीने खंडपीठाला सांगितले की, तो चार वर्षांपासून तुरुंगात आहे आणि त्याच्या खटल्याची सुनावणी सत्र न्यायालयात ८६ वेळा झाली आहे. खंडपीठाने म्हटले, जेव्हा राज्य सरकार जामीन अर्जांना तीव्र विरोध करते, तेव्हा खटल्याची कार्यवाही सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारीही राज्य सरकारची असते, परंतु तसे होताना दिसत नाही. महाराष्ट्र सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलाने न्यायालयाला माहिती दिली की, राज्य सरकार आता प्रत्येक सुनावणीच्या दिवशी सर्व आरोपींना सत्र न्यायालयासमोर हजर करत आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, राज्यांनी खटल्याची कार्यवाही जलद करण्यासाठी एक ठोस धोरण तयार केले पाहिजे. खंडपीठाने म्हटले, दर आठवड्याला किमान चार साक्षीदारांचे जबाब नोंदवले पाहिजेत आणि या आदेशाची नोंद सत्र न्यायालयासमोर ठेवली पाहिजे. भविष्यात अशी प्रकरणे उद्भवल्यास, असेच कठोर आदेश पारित केले जातील.

# गांजा तस्करी उघड

## मुद्देमालासह एक अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील जुन्या महानगरपालिकेजवळ कोतवाली पोलिसांनी धडक कारवाई करत अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या विशाल भिकाजी पारखे ( रा. सारसनगर ) याला अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ६० हजार रुपये किमतीचा ३ किलोपेक्षा जास्त गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल रोहिणी अशोक दरंदले यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सारसनगर येथील भगवानबाबा मंदिराजवळ राहणारा २४ वर्षीय विशाल भिकाजी पारखे हा तरुण जुन्या महानगर पालिकेजवळ संशयास्पद रित्या फिरत होता. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एका पांढऱ्या रंगाच्या गोणीमध्ये अंमली पदार्थ मिळून आला. त्या गोणीत हिरवट रंगाचा, पाने व फुले असलेला आणि उग्र वास येणारा गांजा आढळून आला. गोणीसह त्याचे एकूण वजन ३ किलो ३५९ ग्रॅम आहे. (पान ४ वर)

# अहिल्यानगरसह श्रीरामपूर, राहुरीत एटीएसचे छापे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) शुक्रवारी संपूर्ण राज्यात एक मोठी मोहीम राबवली. या मोहिमेत अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील श्रीरामपूर आणि राहुरी भागात एकूण दहा ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. पाकिस्तानात राहणारा गुंड शहजाद भट्टी याच्याशी काही तरुणांचा संपर्क असल्याच्या संशयावरून एटीएसने ही कारवाई केली आहे. या छाप्यात संशयितांची कसून चौकशी करण्यात आली.

**पाकिस्तानातील गुंडाशी संबंध असल्याच्या संशयावरून १० ठिकाणी चौकशी**

गुंड शहजाद भट्टी हा सोशल मीडियाचा वापर करून भारतीय तरुणांना चुकीच्या मार्गाला लावण्याचा आणि देशविरोधी कारवायांसाठी भडकवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आहे. याच कारणामुळे काल अहिल्यानगर आणि नाशिक एटीएसच्या पथकांनी मिळून श्रीरामपूरमध्ये सहा ठिकाणी, राहुरीमध्ये दोन ठिकाणी आणि अहिल्यानगर शहरातील एमआयडीसी भागात दोन ठिकाणी छापे टाकले.

या कारवाई दरम्यान पथकाने संशयित आरोपींचे मोबाईल फोन आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू तपासासाठी जप्त केल्या आहेत. या प्रकरणात अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून जप्त केलेल्या मोबाईलमधून मोठी माहिती समोर येण्याची शक्यता आहे. गेल्या सहा महिन्यांत एटीएसने जिल्ह्यात छापे टाकण्याची ही तिसरी वेळ असल्याने खळबळ उडाली आहे.

# तलवारीने दोन्ही हाताचे पंजे तोडले!

## राजकीय वादातून घुगलवडगावमध्ये हल्ला : चौघांविरुद्ध गुन्हा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील घुगलवडगाव येथील राजकीय किरकोळ वादाचे शनिवारी रक्तरंजित रूप पाहायला मिळाले. रोहिदास हरिभाऊ दांगडे यांच्यावर त्यांच्याच भावकीतील चौघा हल्लेखोरांनी तलवारीने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात त्यांच्या दोन्ही हातांचे पंजे तोडण्यात आले, तसेच पोट, डोके आणि पाठीवर सपासप वार करण्यात आले.

या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी पुणे येथील संचेती रुग्णालयात हलविण्यात आले असल्याचे समजते.प्राथमिक माहितीनुसार, तालुक्यातील घुगलवडगाव येथील रोहिदास दांगडे हे कामानिमित्त श्रीगोंदयला येऊन परतत असताना आरोपींनी जमावाने त्यांना गाठून अचानक तलवारीने हल्ला चढवला. (पान ४ वर)

# नगर-दौंड महामार्गावर दोन ट्रक समोरासमोर धडकल्या




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** नगर – दौंड महामार्गावर खंडाळा शिवारात ११ जुलै रोजी पहाटच्या सुमारास दोन मालट्रकची समोरासमोर धडक होवून भीषण अपघात झाला. दोन्ही ट्रक एकमेकांवर एवढ्या जोरात आदळल्या की, काही क्षणात दोन्ही ट्रकने पेट घेतला. ही आग मोठ्या प्रमाणात भडकली.या आगीत दोन्ही मालट्रक व त्यामधील माल जळून खाक झाला असून लाखोंचे नुकसान झाले आहे. या अपघातात एक ट्रक चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. (पान ४ वर)

# मोशी दुर्घटना : इमारतीतून ८ मृतदेह बाहेर काढले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पिंपरी चिंचवडच्या मोशी परिसरातील महापालिकेच्या वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पात मुसळधार पावसामुळे कचऱ्याचा प्रचंड मोठा ढिगारा घसरुन प्रशासकीय इमारतीवर कोसळल्याने भीषण दुर्घटना घडली.

बुधवारी घडलेल्या या दुर्घटनेनंतर ढिगाऱ्याखाली २३ जण अडकले होते. यातील १४ जणांना सुखरुप बाहेर काढण्यात यश आले. तर या घटनेत ८ जणांचा मृत्यू झाला. हे मृतदेह बाहेर काढण्यात आले. मात्र एक व्यक्ती बाहेरच्या कचऱ्याखाली दबला गेला. त्याचा शोध सुरु असल्याची माहिती पालिका आयुक्त विजय सुर्यवंशींनी दिली आहे.बचावकार्यासाठी एनडीआरएफ, अग्निशमन दल, लष्कर आणि इतर आपत्कालीन यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत असून विषारी वायू, अस्थिर इमारत आणि सततचा पाऊस यामुळे मदतकार्यात अडथळे येत आहेत. या घटनेनंतर कचरा व्यवस्थापन, सुरक्षा उपाययोजना आणि प्रशासकीय निष्काळजीपणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. 'तुम्ही आमच्याबरोबर चला, आमच्या नातेवाईकांना दिलासा द्या. या इमारतीला भेगा पडल्या होत्या. आम्ही ते फोटो घटना घडण्याच्या आधी दोन दिवस (पान ४ वर)

**एक व्यक्ती बाहेरच्या कचऱ्याखाली, शोधकार्य सुरु**

# अखेर साई जतिन दूध केंद्राला टाळे !

## एफडीएने सिल केल्यानंतरही चालू होते संकलन | 'राष्ट्र सह्याद्री'च्या दणक्याने संकलन बंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील सावळीविहीर बुद्रुक येथील साई जतिन दूध संकलन केंद्रावर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मध्यरात्री धडक कारवाईत नियमांचे पालन करण्यात आले नसल्याचा आरोप करून नियमभंगाचा करत दुधाचा बोगस धंदा सुरू असल्याने केंद्राचा परवाना तात्काळ निलंबित केला होता . परंतू एफडीए च्या कारवाई ला न जुमानता केंद्र चालक पंकज गाढवे यांनी संकलन सुरु ठेवले होते .त्यानंतर दै राष्ट्र सह्याद्रीने याबाबत आवाज उठवताच सदर यंत्रणा त्वरीत बंद करून प्लॅन्ट ला टाळे ठोकल्याचे निदर्शनास आले आहे.

या कारवाईत अन्न व औषध प्रशासन च्या अधिकारी सहाय्यक आयुक्त अ.अ. भोईटे यांच्या



पथकाने त्या दूध प्लॅन्ट मधील सर्व त्रुटी व अनियमितता याची चाचपणी केली असता प्लॅन्ट संचालकाने कोणतेही सहकार्य केले नाही . एका मोठ्या दुध संघाने सार्ई जतीन दुध केंद्राचे गेल्या सहा महिन्यात २२ टॅकर निकृष्ट दर्जाचे कमी प्रत असलेले दूध नाकारण्यात आले होते. ते २२ टॅकर दूधाचे काय केले असा प्रश्न विचारला असता केंद्र चालकाने उडवाउडवीची ची उत्तरे दिली व आमचे काही कुणी करू शकत नाही अशा अर्विभावात समर्पक उत्तरे देता आली नाही. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकारी अ.अ. भोईटे व त्यांचे पथकाने सार्ई जतीन दुध केंद्राकडून नियमांचे पालन करण्यात आले नसल्याचा आरोप करत नियमभंगाचा ठपका ठेवत संपुर्ण प्लॅन्ट सिल केले. अन्न व औषध प्रशासनाने ह्या दूध संकलन केंद्राची तपासणी केली. यावेळी संकलित दुधाचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. तपासणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटी व आस्थापनेने सादर केलेल्या नाकारलेल्या अन्नपदार्थांच्या अहवालाचा विचार करण्यात आला. त्यात संबंधित केंद्राचा व्यवसाय सुरू राहिल्यास ग्राहकांच्या आरोग्याला संभाव्य धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आल्याने अन्न सुरक्षा व मानके विनियम २०११ मधील तरतुदीनुसार या दूध संकलन केंद्राचा परवाना निलंबित करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी नागरिकांना स्वच्छ व निर्भेळ अन्न उपलब्ध व्हावे यासाठी राज्यभर अन्न भेसळविरोधी मोहीम प्रभावीपणे राबवून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.जनहित व जनआरोग्याच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आली आहे अशी माहिती सहायक आयुक्त (अन्न) अ.अ. भोईटे यांनी दिली.

### दै. राष्ट्र सह्याद्रीच्या वृत्ताची दखल; प्लॅन्टला टाळे, दुग्ध व्यवसायात खळबळ!

दै. राष्ट्र सह्याद्रीने संकलन केंद्रावर प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता तेथे दूध शीतकरण प्रक्रिया सुरू असल्याचे वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्तानंतर संबंधित केंद्र चालकाने तत्काळ प्लॅन्ट बंद करून त्याला टाळे ठोकल्याचे निदर्शनास आले. या कारवाईमुळे दुग्ध व्यवसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. मानवी आरोग्यास संभाव्य धोका निर्माण करणाऱ्या या प्लॅन्टचा पर्दाफाश करून तो बंद होण्यासाठी आवाज उठवल्याबद्दल दै. राष्ट्र सह्याद्रीच्या धाडसी पत्रकारितेचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

# जनगणना : भारताच्या भविष्यास दिशा देणारा राष्ट्रीय आराखडा




देशाचा विकास केवळ मोठमोठ्या घोषणा, अर्थसंकल्प किंवा योजनांवर होत नाही. त्या योजनांचा पाया अचूक आणि विश्वासार्ह माहितीवर उभा असतो. भारत सरकारने सुरू केलेली जनगणना ही अशाच माहिती संकलनाची सर्वात व्यापक आणि महत्त्वाची प्रक्रिया आहे. एखाद्या गावात नवीन शाळा उभारायची की रुग्णालय, कोणत्या जिल्ह्याला अधिक निधी द्यायचा, कुठे रस्ते, पाणीपुरवठा आणि सार्वजनिक सुविधा वाढवायच्या, मतदारसंघांची पुनर्रचना कशी करायची किंवा सामाजिक न्यायाच्या योजना कोणत्या घटकांपर्यंत पोहोचवायच्या, या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर जनगणनेत दडलेले असते. म्हणूनच जनगणना म्हणजे केवळ लोकांची गणना नव्हे, तर भारताच्या पुढील अनेक वर्षांच्या विकासाचा आराखडा आहे.

कोरोना महामारीमुळे २०२१ मध्ये होणारी जनगणना पुढे ढकलावी लागली. स्वातंत्र्यानंतर प्रथमच दहावर्षीय जनगणनेची अखंड परंपरा खंडित झाली. या काळात देशात लोकसंख्येची रचना, रोजगार, स्थलांतर, शहरीकरण, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात मोठे बदल झाले. मात्र शासनाकडे उपलब्ध असलेली आकडेवारी जुनीच राहिली. परिणामी अनेक निर्णय कालबाह्य माहितीच्या आधारे घ्यावे लागले. त्यामुळे आता सुरू झालेली जनगणना ही केवळ विलंबाने होणारी प्रक्रिया नसून विकासाला नव्याने दिशा देणारी ऐतिहासिक संधी आहे.

भारतातील जनगणनेचा इतिहासही तितकाच समृद्ध आहे. ब्रिटिश काळात १... मध्ये देशव्या... गणनेचा पहिला प्रयत्न झाला; मात्र तो एकाच वेळी संपूर्ण देशात झाला नव्हता. १८८१ मध्ये प्रथमच संपूर्ण भारतात एकाच वेळी नियमित जनगणना घेण्यात आली आणि तेव्हापासून दर दहा वर्षांनी ही परंपरा सुरू राहिली. स्वातंत्र्यानंतर जनगणना कायदा, १९४८ द्वारे या प्रक्रियेला कायदेशीर अधिष्ठान मिळाले. त्यानंतर भारतातील प्रत्येक जनगणना विकास नियोजनाचा विश्वासार्ह आधार बनली.

आज जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. नागरिकांचे वय, लिंग, साक्षरता, रोजगार, स्थलांतर, घरांची स्थिती, पिण्याचे पाणी, स्वच्छता, दिव्यांगत्व, आर्थिक स्थिती, सामाजिक घटक आणि इतर अनेक बाबींची माहिती त्यातून उपलब्ध होते. ही माहिती शासनासाठी जितकी महत्त्वाची आहे, तितकीच संशोधक, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि लोकसंख्याशास्त्रज्ञांसाठीही अनमोल आहे. कोणत्या भागात विकासाची गरज अधिक आहे, कोणता समाजघटक अजूनही ...वाहापासून दूर आहे ... कोणत्या क्षेत्रात ...धिक गुंतवणूक आवश्यक आहे, याचे ... वास्तव चित्र जनगणना ... दाखवते. यावेळच्या ... जनगणनेचे सर्वाधिक ... चर्चेतील वैशिष्ट्य ... म्हणजे जातीनिहाय ...ाहितीचे संकलन. ...ल नऊ दशकांनंतर ...हा माहिती संकलित होत आहे. सामाजिक न्याय, आरक्षण, मागासवर्गीय समाजांचे प्रतिनिधित्व आणि कल्याणकारी योजनांचे वस्तुनिष्ठ नियोजन करण्यासाठी ही माहिती महत्त्वाची ठरणार आहे. समाजात मतभेद निर्माण करण्यासाठी नव्हे, तर वास्तव समजून घेऊन न्याय्य धोरणे तयार करण्यासाठी या माहितीचा उपयोग झाला पाहिजे, हीच अपेक्षा आहे. तितकेच महत्त्वाचे म्हणजे जनगणना ही विश्वासावर आधारित प्रक्रिया आहे. जनगणना कायद्यामुळे नागरिकांनी दिलेली माहिती पूर्णपणे गोपनीय राहते. ती कोणत्याही न्यायालयीन, पोलीस किंवा कर आकारणीसाठी वापरता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता अचूक आणि संपूर्ण माहिती देणे हे केवळ कायदेशीर नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्य आहे.

यावेळी जनगणना अधिक आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने होत आहे. त्यामुळे माहिती संकलन अधिक अचूक, पारदर्शक आणि जलद होणार आहे. हिमालयातील दुर्गम भाग, सीमावर्ती प्रदेश, बेटे, आदिवासी वाड्या आणि महानगरांतील झोपडपट्ट्यांपर्यंत प्रत्येक व्यक्तीची नोंद घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. लोकशाही व्यवस्थेत कोणताही नागरिक दुर्लक्षित राहू नये, हीच या प्रक्रियेची खरी ताकद आहे.

आज भारत विकसित राष्ट्र बनण्याचे ध्येय समोर ठेवून वाटचाल करीत आहे. हे ध्येय केवळ इच्छाशक्तीने गाठता येणार नाही. त्यासाठी अचूक माहिती, वैज्ञानिक नियोजन आणि पुराव्यावर आधारित निर्णय आवश्यक आहेत. जनगणना ही त्या प्रक्रियेचा सर्वात महत्त्वाचा पाया आहे. म्हणूनच प्रत्येक नागरिकाने या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून खरी व अचूक माहिती द्यावी. कारण जनगणनेत नोंदवला जाणारा प्रत्येक नागरिक हा उद्याच्या भारताच्या विकासाचा समान भागीदार आहे. जनगणना म्हणजे आकड्यांची बेरीज नाही; ती राष्ट्राच्या भविष्यास दिशा देणारी लोकशाहीची सर्वात विश्वासार्ह प्रक्रिया आहे.

# समृद्धी महामार्ग उत्खनन, सुपिक जमिनी खचू लागल्या

## संपादित नसलेल्या जमिनीवर उत्खनन केल्याचे गंभीर प्रकार उघडकीस...




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** राज्याची जीवन वाहिनी ठरलेल्या समृध्दी महामार्गाच्या अंडर पास मध्ये पावसाळ्यात पाणी साचते. शेतक-यांच्या दळणवळण करतांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. या महामार्गाच्या उभारणीसाठी जेथे उत्खनन करण्यात आले. आता त्याच्या शेजारच्या जमिनी खचु लागल्या आहेत. तसेच ज्या शेतक-यांनी आपल्या जमिनी या महामार्गासाठी दिल्या नाहीत त्यांच्या जमिनीत देखील उत्खनन करण्यात आले. हे दोन्ही प्रकार गंभीर असून याची चौकशी करावी. शेतक-यांना दिलासा द्यावा. अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी विधीमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहात बोलतांना केली.

> समृद्धी महामार्गाची निर्मिती करतांना या महामार्गाच्या भरावासाठी ज्या जमिनींचे उत्खनन झाले त्या जमिनीच्या आजूबाजूला असणाऱ्या इतर शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी खचू लागल्या आहेत. धक्कादायक बाब म्हणजे ज्यावेळी जमिनींची मोजणी केल्यानंतर असे आढळून आले की, ज्या शेतक-यांनी आपल्या जमिनी उत्खननासाठी दिल्या नसतांना त्यांच्याही जमिनीत खोदाई करण्यात आली. हि अतिशय गंभीर बाब असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्फत या प्रकाराची चौकशी करावी.- आमदार आशुतोष काळे.

ते म्हणाले, हा महामार्ग राज्याची जीवनवाहिनी ठरत आहे. कोपरगाव तालुक्यातून जाणाऱ्या या समृद्धी महामार्गाचे अंतर२९.३९६ किलोमीटर आहे.या अंतरात स्थानिक नागरिकांच्या दळणवळणासाठी लहान-मोठे पूल आणि एकूण २४ अंडरपास बांधण्यात आले आहेत. कोपरगाव तालुक्यात जमिनीत खोलपर्यंत मातीचे प्रमाण जास्त असल्यामुळे महामार्गाच्या भरावासाठी ठेकेदाराला जवळच्या अंतरावर आवश्यक ते मटेरियल उपलब्ध झाले नाही. त्यामुळे संबधित ठेकेदाराने समृद्धी महामार्गाच्या मुख्य भरावाची उंची कमी करून त्याऐवजी महामार्गाखालून जाणाऱ्या सर्व बोगद्यांची खोली दोन ते अडीच फुटांनी वाढवली. हे काम नियमबाह्य आणि चुकीचे आहे. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात या बोगद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचते व दळणवळणासाठी नागरिकांना अनेक अडचणी निर्माण होतात. जास्त प्रमाणात पाऊस झाल्यास पाणी जास्त दिवस साचून राहते त्यामुळे हे बोगदे वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद असतात. गेल्या चार पाच वर्षांपासून अधिकारी उडवा उडवीची उत्तरे देत आहेत.

# वीज पडून मृत्यू झालेल्या मिराबाई थोरात यांच्या वारसांना चार लाखांची मदत मंजूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील मायगाव देवी येथील मिराबाई सुरेश थोरात यांचा अवकाळी पावसात वीज पडून झालेल्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांना शासनाकडून नैसर्गिक आपत्ती मदत निधीतून चार लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. या मदतीसाठी माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे व आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. दि. १३ मे २०२६ रोजी कोपरगाव तालुक्यात झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटादरम्यान मिराबाई थोरात यांच्या अंगावर वीज कोसळल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर स्नेहलताताई कोल्हे यांनी मायगाव येथे जाऊन कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. त्यानंतर तहसीलदार महेश सावंत यांच्याकडे शासनाच्या मदतीसाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत पाठपुरावा करण्यात आला. महसूल प्रशासनाने पंचनामा, कागदपत्रांची पूर्तता आणि प्रस्ताव शासनाकडे सादर केल्यानंतर तो मंजूर झाला असून, मिराबाई थोरात यांचे पती सुरेश थोरात यांना चार लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार आहे. याबाबत स्नेहलताताई कोल्हे म्हणाल्या, नैसर्गिक आपत्तीत कुटुंबातील व्यक्ती गमावण्याचे दुःख कोणत्याही आर्थिक मदतीने भरून निघू शकत नाही. मात्र शासनाच्या या मदतीमुळे संकटग्रस्त कुटुंबाला कठीण काळात काही प्रमाणात आर्थिक आधार मिळेल, हीच या मदतीमागील भावना आहे.

# पुणतांबा-श्रीरामपूर रस्त्यावरील मृत्यूचे सापळे हटवा : सरपंच डॉ. धनंजय धनवटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** पुणतांबा - श्रीरामपूर रस्त्यावरील धोकादायक वळणे, रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे आणि रेल्वे प्रशासनाचे अनधिकृत कुंपण यामुळे हा रस्ता अपघातांचा मुख्य केंद्रबिंदू बनला आहे. या पार्श्वभूमीवर, नागरिकांच्या जीवितास असणारा धोका टाळण्यासाठी रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी पुणतांबा गावचे प्रथम लोकनियुक्त सरपंच डॉ. धनंजय धनवटे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर यांना लेखी निवेदन दिले आहे.



या निवेदनात डॉ. धनवटे यांनी अत्यंत चिंता व्यक्त केली आहे. पुणतांबा-श्रीरामपूर रस्त्यावर अनेक ठिकाणी गंभीर स्वरूपाची धोकादायक वळणे आहेत, जिथे वारंवार अपघात होत आहेत.नुकत्याच झालेल्या बुधवारच्या अपघातात एका व्यक्तीला आपला जीव गमवावा लागला आहे. दोन आठवड्यांपूर्वी झालेल्या एका भीषण अपघातातील जखमी तरुण आजही रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहे. 'लिटिल एंजल्स स्कूल' फाट्यावरून शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना तातडीने गतिरोधक उभारण्याची मागणी यापूर्वीही अनेकदा करण्यात आली आहे, परंतु प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

पुणतांबा-श्रीरामपूर रस्त्यावरील १९ चारीचे खोलीकरण पूर्ण झाले आहे. मात्र, हे काम झाल्यानंतर रस्त्याच्या सुरक्षिततेची काळजी न घेतल्याने हा भाग अत्यंत धोकादायक बनला आहे. यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून सार्वजनिक बांधकाम विभागाने युद्धपातळीवर येथे सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

> **नाहीतर तीव्र आंदोलनाचा इशारा!**
> ''पुणतांबा आणि परिसरातील नागरिकांच्या जीविताचा हा प्रश्न आहे. भविष्यातील मोठे अनर्थ टाळण्यासाठी संगमनेर तसेच श्रीरामपूरच्या कार्यकारी अभियंत्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ आदेश देऊन ही कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल.''
> **- डॉ. धनंजय धनवटे (प्रथम लोकनियुक्त सरपंच, पुणतांबा)**

रेल्वे विभागाने आपली हद्द दर्शवण्यासाठी रस्त्यालगत उभारलेले लोखंडी पोलांचे कुंपण काही ठिकाणी अनधिकृत रित्या पुढे आले होते. काही महिन्यांपूर्वी सूचना केल्यानंतर रेल्वे प्रशासनाने काही भाग मागे घेतला असला, तरी अद्यापही सुमारे २०० ते ३०० मीटर लांबीचे कुंपण रस्त्याच्या खूप जवळ आहे. यामुळे वाहनचालकांना अंदाज येत नसून मोठा धोका निर्माण झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने रेल्वे अधिकाऱ्यांशी तातडीने समन्वय साधून हे कुंपण मागे घेण्यास भाग पाडावे, असे डॉ. धनवटे यांनी म्हटले आहे.

रेल्वे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील रस्त्यांवर जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत. तसेच, पुणतांबा-मातुलठाण हा मुख्य जिल्हा मार्ग असून याही रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना पाठीचे आजार जडले असून वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे.

# बेलदारवाडी दिंडीचे नेवासा नगरीत स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** जळगाव जिल्हयातील बेलदारवाडी तालुका चाळीसगाव येथील सिध्देश्वर आश्रमातील श्री निवृत्तीनाथ महाराज तुसे आषाढी वारी पायी पालखी दिंडीचे संत ज्ञानेश्वरांची कर्मभूमी असलेल्या नेवासेनगरी मध्ये तोफांच्या उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली तुसे महाराज यांच्या नेतृत्वाखाली ही दिंडी सुरु असून दिंडीचे हे ३४ वे वर्ष आहे. बेलदारवाडी येथून वटपौर्णिमेच्या दिवशी ही दिंडी निघाली आहे.या दिंडीचे हे ३४ वे वर्ष आहे दिंडीत सुमारे ७०० स्त्री व पुरुष वारकरी भाविक सहभागी झाले आहेत. पुष्पांनी सजविलेल्या पालखी दिंडीचे आगमन झाल्यानंतर फटाक्यांच्या आतशबाजीने स्वागत करण्यात आले .यावेळी सदर दिंडी विसाव्यासाठी नेवासा येथील आराध्या मंगल कार्यालयात थांबली असता झालेल्या प्रवचनात या दिंडीचे प्रमुख हभप ज्ञानेश्वर माऊली परदेशी महाराज यांनी या तीर्थक्षेत्र नेवासा स्थानाचे महत्व दिंडीतील वारकऱ्यांना सांगितले. यावेळी दिंडी अन्नदाते नेवासा येथील वास्तूशिल्पकार राजेंद्र परदेशी व सौ.सरोज परदेशी, कैलास परदेशी,सूरज परदेशी,तुषार परदेशी यांच्या हस्ते दिंडी प्रमुख हभप ज्ञानेश्वर माऊली महाराज तुसे यांचे सपत्नीक संतपूजन करण्यात आले.उपस्थित वारकऱ्यांना परदेशी परिवाराच्या वतीने गुलाबजामसह मिष्टान्न भोजन देण्यात आले




# कृषि विद्यापीठातील शेळी संशोधन प्रकल्प शेळी पालकांसाठी दिशादर्शक : डॉ. खर्चे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शेळी संशोधन प्रकल्पामध्ये शेळी पालकांच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण हॉल, शेळ्यांच्या लेंडीखताचे मुल्यवर्धन करण्यासाठी गांडूळखत प्रकल्प तसेच शेळ्यांसाठी आधुनिक शेडची उभारणी करण्यात आली आहे. या शेळी संशोधन प्रकल्पात निर्माण केलेल्या सुविधा, गांडुळखत प्रकल्प व गोट गॅलरी शेळी पालकांना दिशादर्शक ठरेल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी केले.महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अखिल भारतीय समन्वीत शेळी संशोधन प्रकल्पामध्ये प्रशिक्षण हॉल, गांडुळखत प्रकल्प व शेळ्यांसाठी तयार करण्यात आलेले आधुनिक शेडचे उद्घाटन व वृक्षारोपन कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश दोडके, वनस्पती रोगशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रविंद्र गायकवाड, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा नियंत्रक डॉ. सचिन नांदगुडे, बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र काशिद, कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, सहयोगी संशोधन संचालक डॉ. बाळासाहेब पाटील व प्रकल्पाचे वरिष्ट शास्त्रज्ञ डॉ. विष्णू नरवडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विष्णू नरवडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. उल्हास गायकवाड यांनी मानले.

# चिंचबन येथे ऊस, कापूस, हळद पीक व्यवस्थापनावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** मुळा एज्युकेशन सोसायटी संचलित, महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्न कृषी महाविद्यालय, सोनई यांच्या ग्रामीण कृषी जागरूकता व कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम २०२६-२७ अंतर्गत ''शेतकऱ्यांच्या बांधावर तंत्रज्ञान प्रचार-प्रसार'' या उपक्रमाअंतर्गत ''ऊस व कापूस पीक व्यवस्थापन'' या विषयावरील कृषी चर्चासत्राचे आयोजन नेवासा तालुक्यातील चिंचबन येथे करण्यात आले होते यावेळी मार्गदर्शक तज्ञ प्रा. राहुल गडाख (कृषि विद्या विभाग) ऊस पिकाचे संपूर्ण हंगामी नियोजन तसेच ऊसाचे लागवड आधुनिक तंत्रज्ञान त्यामध्ये वाणांची निवड, पाणी, खते व्यवस्थापन, पाचट व्यवस्थापन, स्मुक्ष अन्नद्रव्ये व्यवस्थापन तंत्रज्ञान सांगण्यातआले. त्याचबरोबर कापूस पिकाच्या उत्पादनवाढीसाठी आवश्यक कृषी आधुनिक तंत्रज्ञान याविषयी सखोल माहिती देण्यात आली. प्रा. नरेंद्र दहातोंडे(कीटकशास्त्र विभाग) यांनी कापूस आणि ऊस पिकातील एकात्मिक कीड व्यवस्थापनामध्ये विविध किडींची ओळख आणि आर्थिक नुकसानीची पातळी आणि ते कमी करण्याच्या उपाययोजन जैविक कीड, नियंत्रण आवश्यकतेनुसार शिफारशीत कीटकनाशकांचा संतुलित वापर याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरूडे यांनी कापूस आणि ऊस पिकातील उच्च उत्पादन तंत्रज्ञान यामध्ये मृदा परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन, सुधारित वाणांचा अवलंब, स्मार्ट सिंचन प्रणाली, मोबाईल कृषी ॲप्सचा वापर, हवामान अंदाजानुसार शेती नियोजन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, जैविक खतांचा प्रभावी वापर आणि अचूक शेतीआधारित कृषी सल्ला यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष चौगुले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.या कार्यक्रमाचे आयोजन कृषीदूत सोमेश्वर कोतकर, विजय गर्धे, अथर्व गोडसे, शेखर गायकवाड, राहुल गंगावणे व धनराज बांदल यांनी यशस्वीरीत्या केले.



# ऑलिम्पियाड मध्ये आत्मा मालिकचा दबदबा कायम 'गोल्डन स्कूल' अवॉर्ड ने केले सन्मानीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :-** इंडियन टॅलेंट ऑलंपियाड तर्फे घेण्यात आलेल्या ऑलिम्पियाड परिक्षेत आत्मा मालिक सेमी इंग्लीश मिडीयम गुरूकूलने देशपातळीवर आपला दबदबा कायम ठेवला. या विद्यालयाच्या तब्बल १३१ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादित स्थान मिळवीत राष्ट्रीय पातळीवरील आपले अव्वल स्थान यंदाही कायम ठेवले. हि कामगीरी लक्षात घेऊन या गुरूकूल विद्यालयाला गोल्डन स्कुल ऑफ अवार्ड देऊन सन्मानीत करण्यात आले. अशी माहिती प्राचार्य निरंजन डांगे यांनी दिली. ते म्हणाले, इंडियन टॅलेंट ऑलंपियाड तर्फे देश पातळीवर गणित,विज्ञान, इंग्रजी, कला, संगणक आणि जनरल नॉलेज या विषयांची ओलंपियाड परीक्षा घेतली जाते. या परिक्षेत गुरूकुलाच्या १३१ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. त्यात ६ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत, १४ विद्यार्थ्यांना एक्सलन्स अवार्ड, ३८ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल ३७, विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल व ३६ विद्यार्थ्यांना ब्रांन्झ प्राप्त केले. हे आत्मा मालिक पॅटर्नचे हे यश आहे. अभ्यासक्रमाचे सूक्ष्म नियोजन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, तयारीसाठी विशेष शिबिरांचेआयोजन, नैदानिक चाचण्या, सराव परीक्षा, तज्ञांचे मार्गदर्शन यामुळे हे यश प्राप्त झाले.या विद्यार्थ्यांत श्लोक गंगापूरकर राज्यात चैतन्य घोडके, साई घोडके व आरव नानेकर , प्रणव बदाडे , यशवंत जाधव यांनी अनुक्रमे पहिले पाच क्रमांक पटकावले. या विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे विभाग प्रमुख अनिल सोनवणे ,सचिन डांगे , पर्यवेक्षक नयना शेटे ,गणेश रासने ,इंडियन टॅलेंट कॉर्डिनेटर अमोल कर्डिले, राजेंद्र जाधव ,विषय शिक्षक अनिता वाणी, रूपाली होन, अजय कांबळे , गुरुराज सज्जन, पंकज गुरसळ,अनुष्का यादव, रोहिणी होन, प्रियांषु कुमार, हरीश तेली यांचे मार्गदर्शन लाभले.या विद्यार्यांचे संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, मीरा पटेल यांनी अभिनंदन केले.




# जे. टी. एस हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांकडून दिंडीतील वारकऱ्यांना दुध वाटप




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :**येथील जेठाभाई ठाकरशी सोमय्या हायस्कूलच्या २००१-०२ बचच्या माजी विद्यार्थ्यांनी संत निवृत्तीनाथ महाराजांच्या दिंडीतील वारकऱ्यांना दोनशे लिटर मसाला दूध वाटपाचा अनोखा उपक्रम राबविला. या उपक्रमाचे ग्रामस्थांनी कौतुक केले आहे .बेलापूरच्या अध्यात्मिक क्षेत्रातील युवक किरण गागरे यांच्या संकल्पनेतून पार पडलेल्या सदर अभिनव उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधव कोळपकर,सचिन कारले, निलेश करपे, कुणाल भोसले, दीपक गायकवाड मुकुंद बंगाळ, विजय कुताळ, निरज थोरात, अजय राजेभोसले, सूर्यकांत कांडेकर, घनश्याम काळे, रियाज सय्यद, शिवदास म्हसे यांनी प्रयत्न केले. तसेच सदर उपक्रमासाठी हॉटेल स्वराज्यचे कार्यकारी अध्यक्ष अनिल पवार यांनी विशेष सहकार्य केले. सदरचे माजी विद्यार्थी दरवर्षी स्नेह मेळावा, मित्रांचे वाढदिवस साजरा करणे, दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देणे, बेलापूर गावात येणाऱ्या दिंडींचे आदरांतिथ्य करणे, मुस्लिम स्नेह्याच्या पालकांच्या हज उमरा या पवित्र तीर्थस्थानी यात्रेला निघाल्यानंतर यथोचित सन्मान करणे, राष्ट्रीय सणानिमित्त मध्ये जिल्हा परिषद शाळांमध्ये अल्पोपहार देणे असे विविध उपक्रम नियमिपणे राबवून सामाजिक योगदान देत असतात.

# राहुरीत वारकऱ्यांचा सेवेसाठी आरोग्यमदिंडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** आरोग्य विभाग व डॉ तनपुरे कारखाना संचलित नर्सिंग होम यांच्या वतीने वारकऱ्यांची सेवा म्हणजेच लाडक्या विठ्ठलाची सेवा या भावनेतून संत निवृत्ती महाराज पालखी सोहळ्यात राबवलेली आरोग्यमंदिंडी उपक्रम वारकऱ्यांसाठी मोठा आधार ठरला

पंढरपूर वारीसाठी पायी निघालेल्या हाजारो वारकऱ्यांची आरोग्य तपासणी औषध उपचार व आवश्यक वैद्यकीय सेवा देऊन आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवाभावाचे अनंत दर्शन दिले राहुरी येथे पालखी मुक्कामी दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र म्हैसगाव यांच्या वतीने सर्दी ताप पायाच्या जखमा व इतर किरकोळ आजाराची तपासणी करून औषध उपचार केले.पावसाळी वातावरणात आरोग्य पथकाने दिवसभर कार्यरत राहून वारकऱ्यांच्या अखंड सेवा दिली. राहुरी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सुरेश तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी डॉ.दिपाली गायकवाड यांनी भेट देऊन आरोग्य विभागस मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. आरिफ पाटणकर, वैभव तांबे डॉ. ऐश्वर्या सोनवणे डॉ. योगेश माळवदे मंगेश वेदपाठक आरोग्य सेविका जयश्री दोंदे, रेश्मा देशमुख, चैतन्य बडे आदींनी वारकऱ्यांची सेवा केली.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## पिचडगावच्या माऊली आश्रमातील पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान



**नेवासा** : तालुक्यातील श्री क्षेत्र माऊली आश्रम पिचडगांव ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडीचे माऊली आश्रमाचे प्रमुख महंत हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी दि.११ जुलै रोजी ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष करत पंढरपूरकडे प्रस्थान झाले, दिंडीचे हे १० वे वर्ष आहे. या दिंडीच्या शुभारंभ प्रसंगी स्वामी रमेशानंदगिरी महाराज, गणेशानंदगिरी महाराज, विजय महाराज पवार,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, सीताराम महाराज पठाडे,कल्याण महाराज पवार, समाधान महाराज कन्हेरकर,बदाम महाराज पठाडे, श्रीधर महाराज अनुभुले,ज्ञानेश्वरचे संचालक दत्तूभाऊ काळे,डॉ. शिवाजी शिंदे,उद्योजक शिवाभाऊ पाठक, सरपंच पोपटराव हजारे, दिलीपराव सरोदे, सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ यांच्या हस्ते पालखी दिंडीतील पादुकांचे पूजन करण्यात आले. संतसेवक अंबादास गव्हाणे यांनी सूत्रसंचालन केले. पंढरपूरकडे प्रस्थानासाठी निघालेल्या दिंडीस अंबादास ब्राम्हणे,अशोक निपुंगे, ज्ञानदेव शिंदे,एकनाथ शेंडगे यांच्या वतीने एकादशीच्या निमित्ताने दिंडी वाटेवर फराळाचे वाटप करण्यात आले. दिंडीत महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## नागेबाबा मल्टीस्टेटकडून आरोग्य विम्याचा धनादेश प्रदान



**टाकळीभान** : श्री संत नागेबाबा मल्टीस्टेटच्या टाकळीभान शाखेतर्फे नागेबाबा सभासद सुरक्षा कवच योजनेअंतर्गत सभासद भाऊसाहेब सूर्यभान मुंजाळ यांना १ लाख ३ हजार ८४० रुपयांचा आरोग्य विम्याचा धनादेश प्रदान करण्यात आला. काही दिवसांपूर्वी झालेल्या रस्ते अपघातानंतर उपचारासाठी झालेल्या खर्चापोटी ही मदत देण्यात आली. संस्थापक अध्यक्ष कडूभाऊ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणारी नागेबाबा सभासद सुरक्षा कवच योजना सभासदांना आर्थिक सुरक्षितता देण्याचे कार्य करत आहे. वार्षिक अल्प प्रीमियम भरून या योजनेत सहभागी झालेल्या सभासदांना अपघाती मृत्यू झाल्यास वारसांना १० लाखांपर्यंत आर्थिक मदत, तर अपघातानंतर उपचारासाठी ५ लाखांपर्यंत वैद्यकीय खर्चाचा लाभ दिला जातो. धनादेश वितरण कार्यक्रमाला माजी सरपंच सचिन मुरकुटे, सोसायटीचे चेअरमन दिगंबर बारस्कर, मधुकर मैड, एरिया डेव्हलपमेंट ऑफिसर एकनाथ नांदे, शाखाधिकारी रविंद्र व्यवहारे तसेच नागेबाबा संस्थेचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ आणि मुंजाळ परिवार उपस्थित होते.

## साई दिंडीतील वारकऱ्यांना खर्डे परिवाराकडून अन्नदान

**कोल्हार** : श्रीक्षेत्र शिर्डी येथून ह.भ.प. काशीकानंद महाराज यांच्या नेतृत्वाखाली आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे निघालेल्या संतश्रेष्ठ साईबाबा पायी दिंडी सोहळ्याचे कोल्हार भगवतीपुर येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर आणि साईनाथ महाराज की जय, रामकृष्ण हरी तसेच विठ्ठल विठ्ठलच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. दिंडीत सुमारे एक हजार पुरुष व महिला वारकरी सहभागी झाले होते. दिंडीतील वारकऱ्यांसाठी कोल्हार बुद्रुक ग्रामपंचायतीचे माजी सरपंच ड. सुरेंद्र खर्डे पाटील यांच्या परिवाराच्या वतीने अन्नदान करण्यात आले. तसेच पालखीचे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. यावेळी ड. सुरेंद्र खर्डे पाटील, अनिल खर्डे पाटील, डॉ. सुनील खर्डे तसेच खर्डे पाटील परिवारातील सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. धुळे, नाशिक आणि परिसरातील विविध दिंड्यांचा कोल्हार येथे मुक्काम होतो.

## संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे तहसीलदार डॉ. अमित पवार यांनी कुटुंबासह केले स्वागत



**राहुरी** : श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेल्या संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्याचे राहुरी तालुक्यात आगमन होताच राहुरीचे तहसीलदार डॉ. अमित पवार यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबासह उपस्थित राहून भक्तिभावाने स्वागत केले. यापूर्वी तहसीलदार या नात्याने अधिकारी म्हणून पालखीच्या स्वागतासाठी उपस्थित राहण्याची परंपरा होती. मात्र डॉ. अमित पवार यांनी त्या परंपरेला वेगळा आयाम देत कुटुंबासह उपस्थित राहून विठ्ठल भक्तीचा आनंद अनुभवला. त्यांच्या या उपक्रमाचे वारकरी तसेच उपस्थित नागरिकांनी कौतुक केले. यावेळी डॉ. अमित पवार यांच्या धर्मपत्नी योगिता पवार, वडील रमेश पवार तसेच आई ज्योती पवार हेही उपस्थित होते. संपूर्ण पवार कुटुंबाने संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचे दर्शन घेत वारकऱ्यांचे स्वागत केले आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी प्रार्थना अर्पण केली. पालखी सोहळ्याच्या स्वागतावेळी परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

# माऊलींच्या दिंडीला 'शंकरा'ची साथ घाटाला मिळालं 'ज्ञानेश्वरी'चे नाव...!

## पांढरी पुलाजवळील इमामपूर घाटाचे नामकरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा / सोनई** : संत परंपरेचा समृद्ध वारसा लाभलेल्य नेवासा येथील ज्ञानेश्वरी पायी दिंडी सोहळ्याच्या प्रस्थान मार्गावरील इमामपूर घाटाला आता 'ज्ञानेश्वरी घाट' अशी नवी ओळख मिळाली आहे. यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात उद्धव महाराज नेवासेकर, देविदास महाराज म्हस्के, राम महाराज झिंजुर्के, माजी मंत्री शंकरराव गडाख, ज्ञानेश्वर देवस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, यशवंत प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष उदयन गडाख, नंदकिशोर महाराज खरात आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत घाटाचे नामकरण करण्यात आले.

या सोहळ्यास यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या डॉ. निवेदिता गडाख, रविराज गडाख, मुळा संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब मोटे, व्हा संस्थेचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांच्यासह हजारो वारकरी, भाविक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





पांढरीपुलाजवळील इमामपुर घाटाचे नामकरण ज्ञानेश्वरी घाटकरतांना महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक, देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,माजी मंत्री शंकरराव गडाख,राम महाराज झिंजुर्के,युवा नेते उदयनदादा गडाख आदी

### युवा नेते उदयन गडाख यांचं होतं विशेष लक्ष...!

माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली इमामपूर घाटाला 'ज्ञानेश्वरी घाट' असं नाव देण्याचं आणि या फलकाच्या अनावरण सोहळ्याचं संपूर्ण नियोजन युवा नेते उदयन गडाख यांच्याकडे होतं. यामध्ये त्यांनी विशेष लक्ष घालून पैस खांबाची प्रतिकृती आणि 'ज्ञानेश्वरी घाट' ही अक्षर असलेला एलईडी फलक स्वतः तयार करुन घेतला. या फलकाच्या अनावरण सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी उदयन गडाख यांच्यासह यशवंत प्रतिष्ठानच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्न केले.

टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. घाटाच्या नामकरणाबरोबरच परिसराचे आध्यात्मिक सौंदर्य अधिक खुलविण्यासाठी घाटाच्या पायथ्याशी संत ज्ञानेश्वर महाराजांचे भव्य शिल्प तसेच पैस खांबाची आकर्षक प्रतिकृती उभारण्यात आली आहे. या कलाकृती भाविकांसह येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत असून परिसराच्या धार्मिक व सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घालत आहेत.यावेळी उपस्थित मान्यवरांनी नेवासा भूमीत संत ज्ञानेश्वर महाराजांनी रचलेल्या 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाच्या ऐतिहासिक, धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेचा गौरव केला.

याप्रसंगी बोलताना ह भ प देविदास महाराज म्हस्के व ह भ प उद्धव महाराज मंडलीक नेवासेकर यांनी 'ज्ञानेश्वरी घाट' या नामकरणामुळे इमामपूर घाटाला वारकरी संप्रदाय, संत साहित्य आणि अध्यात्माशी जोडणारी नवी ओळख मिळणार असून भाविकांसाठी हे स्थळ अधिक प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला व मा मंत्री शंकरराव गडाख यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले वारकऱ्यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या शिल्पास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

मोठ्या भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून 'ज्ञानेश्वरी घाट' हे नाव वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचे नवे प्रतीक ठरणार आहे. याप्रसंगी यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरीप हंगामात शास्त्रीय पद्धतीने पेरणी करा

## कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहाता तालुक्यात सर्व सहा मंडळांमध्ये सुमारे १०० मि.मी. पावसाची नोंद झाल्याने जमिनीत वापसा स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर खरीप हंगाम २०२६ मध्ये हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन पिकांचे नियोजन करावे आणि कृषी विभागाच्या शिफारशीनुसार शास्त्रीय पद्धतीने पेरणी करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांनी केले आहे.

गतवर्षी तालुक्यात ५७ हजार ८४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली होती. यंदा २५ हजार हेक्टरवर सोयाबीन, ११ हजार हेक्टरवर मका आणि ९ हजार ६०० हेक्टरवर कापूस लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. उपलब्ध पाणी, जमिनीचा प्रकार, हवामानातील बदल आणि बाजारपेठेतील मागणी लक्षात घेऊन पिकांची निवड करावी, असेही त्यांनी सांगितले. पेरणीपूर्वी माती परीक्षण करून मृदा आरोग्य पत्रिकेनुसार संतुलित खतांचा वापर करावा. प्रमाणित बियाण्यांची निवड करून बुरशीनाशक तसेच रायझोबियम, पीएसबी आणि



ट्रायकोडर्माद्वारे बीजप्रक्रिया करावी. समाधानकारक पाऊस झाल्यानंतरच घाई न करता पेरणी करण्याचा सल्लाही कृषी विभागाने दिला आहे.

मध्यम व भारी जमिनीत अतिरिक्त पाण्याचा निचरा आणि ओलावा संवर्धनासाठी बीबीएफ पद्धतीचा अवलंब करावा. तसेच एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, जैविक कीडनियंत्रण, पिवळे व निळे चिकट सापळे, फेरोमोन सापळ्यांचा वापर करून कीड व रोगांचे नियंत्रण करावे. विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत व अधिक माहितीसाठी कृषी सहाय्यक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन आबासाहेब भोरे यांनी केले.

# राष्ट्र सह्याद्री वृत्ताची दखल

## नेवासा कृषी कार्यालयातील वादग्रस्त फलक अखेर हटवला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शनिशिंगणापूर** : नेवासा तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या नावाखाली अनेक वर्षांपासून लावण्यात आलेला आणि शेतकऱ्यांना धाक दाखवणारा असल्याची भावना निर्माण करणारा वादग्रस्त फलक अखेर हटविण्यात आला आहे.

या संदर्भातील दै. राष्ट्र सह्याद्रीमध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर वरिष्ठ कृषी कार्यालयाने तत्काळ दखल घेत संबंधित फलक काढण्याचे आदेश दिले.

नेवासा तालुका कृषी कार्यालयात शेतकऱ्यांना धमकावणारा फलक अद्याप कायम या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडून खुलासा मागवून तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

त्यानुसार कार्यालय प्रशासनाने संबंधित फलक हटविला. फलक हटविल्यानंतर शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, शासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांना सन्मानाची वागणूक मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. शेतकऱ्यांमध्ये भीती किंवा गैरसमज निर्माण करणारे फलक कार्यालयात नसावेत, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. या प्रकरणी तातडीने दखल घेऊन कार्यवाही केल्याबद्दल वरिष्ठ कृषी अधिकाऱ्यांचे शेतकरी वर्गातून स्वागत करण्यात येत आहे. भविष्यातही शेतकरीहिताच्या प्रश्नांवर प्रशासनाने अशीच तत्पर भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

### संशयास्पद किंवा नागरिकांना धाक दाखवणारे फलक आढळल्यास माहिती द्या

शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या नावाखाली नागरिकांना धाक दाखवणारे किंवा चुकीचा संदेश देणारे फलक आढळल्यास संबंधित विभाग अथवा सामाजिक कार्यकर्त्यांशी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते संजय वैरागर यांनी केले आहे.

## दवणगाव सोसायटीच्या चेअरमनपदी जऱ्हाड तर व्हा. चेअरमनपदी महाडिक बिनविरोध



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील दवणगाव येथील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या दवणगाव विविध कार्यकारी सोसायटीच्या निवडणुकीत चेअरमन पदी दिलीप अंबादास जऱ्हाड तर व्हाईस चेअरमन पदी नंदकुमार आप्पासाहेब महाडिक यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मोबीन शेख यांनी काम पाहिले. यावेळी अध्यक्षपदासाठी दिलीप जऱ्हाड व उपाध्यक्ष पदासाठी नंदकुमार महाडिक यांचे एकमेव अर्ज आले होते. विरोधी पार्टीकडून कुणीही अर्ज न दिल्याने अध्यक्ष उपाध्यक्षांची निवडणूक बिनविरोध घोषित करण्यात आली याप्रसंगी मावळते चेअरमन नारायण खपके व अशोक भोसले यांच्यासह अशोक मारुती कासार व बाळासाहेब गंगाधर थोरात हे सदस्य उपस्थित होते. बिनविरोध निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा जमलेल्या नागरिकांनी व सदस्यांनी शुभेच्छा देऊन सत्कार केला. यावेळी बोलताना नूतन अध्यक्ष दिलीप जराड म्हणाले की माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला मी सार्थ राहून सोसायटीचे काम प्रामाणिकपणे पार पाडणार आहे.

## ज्ञानेश्वर कारखान्याच्या तज्ज्ञ संचालकपदी डॉ. क्षितिज घुले व रविंद्र नवले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यातील भेंडे येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यांचे तज्ज्ञ संचालकपदी डॉ. क्षितिज नरेंद्र घुले पाटील व रविंद्र काशिनाथ नवले पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.लोकनेते श्री मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची सभा अध्यक्ष नरेंद्र घुले पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात ही निवड झाली. यावेळी संचालक माजी आ. चंद्रशेखर घुले, उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे,संचालक पंडितराव भोसले, अशोक मिसाळ, डॉ.नारायण म्हस्के, जनार्धन कदम, मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, अँड.हिंमतसिंह देशमुख, अमोल अभंग, विकास नन्नवरे, संतोष पावसे, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे, प्रसाद पटारे, रामनाथ राजापुरे, गोरक्षनाथ भेंडेकर, बाळासाहेब खरड, काशिनाथ नवले, दत्तात्रय काळे, अशोक तानवडे, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, यवस्थापक रविंद्र मोटे, कामगार संचालक सुखदेव फुलारी, तांत्रिक सल्लागार ए.बी. खरड, एम.एस. मुरकुटे, एस.डी.चौधरी, महेंद्र पवार, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के, मुख्य शेतकी अधिकारी सुरेश आहेर, विलास लोखंडे, सुधाकर ढाकणे, हनुमंता शेंडगे, महेश भवर, दत्तात्रय चिमणे, कल्याण जांभूळकर आदी उपस्थित होते.

## विधानपरिषदेत जलजीवन मिशनच्या प्रश्नावर प्राजक्त तनपुरे आक्रमक

### विचारला सरकारला जाब

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनांच्या रखडलेल्या कामांचा प्रश्न आमदार प्राजक्त तनपुरे यांनी विधानपरिषदेत आक्रमक होऊन शासनाला जाब विचारला. गेल्या तीन वर्षांपासून शासनाकडून सुधारित अंदाजपत्रके तयार करण्यात येत आहेत हेच उत्तर दिले जात असल्याचा आरोप करत त्यांनी या कामातील दिरंगाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी तनपुरे यांनी शासनाकडे अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. सुधारित अंदाजपत्रके नेमकी कधी पूर्ण होणार?, रखडलेला निधी कधी उपलब्ध होणार?, फेरसर्वेक्षणाची वेळ का आली?, तसेच चुकीचे सर्वेक्षण करणाऱ्या संबंधित एजन्सींवर कारवाई होणार का?, असा थेट सवाल त्यांनी केला. जलजीवन मिशनच्या कामांमध्ये झालेल्या विलंबामुळे अनेक गावांतील नागरिकांना अद्यापही शुद्ध पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे तनपुरे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. नागरिकांना सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क असून, योजनेतील दिरंगाई व निष्काळजीपणाबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. जलजीवन मिशनअंतर्गत रखडलेल्या कामांना गती देऊन आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून संबंधित जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी शासनाकडे केली.

# सेवा निवृत्ती नोकरीची; नात्याची नाही : आ.आशुतोष काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समुहात कर्मचारी आणि व्यवस्थापन यांचे नाते केवळ कामापुरते मर्यादित नाही. काळे परिवाराने प्रत्येक कर्मचाऱ्याला कुटुंबातील सदस्य मानले आहे. सुख-दुःखात एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याची परंपरा आपण जपली आहे. हीच आपल्या संस्थेची खरी ताकद आणि खरी ओळख आहे.

त्यामुळे सेवानिवृत्ती ही नोकरीची आहे नात्याची नाही असे प्रतिपादन कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व आसवनी विभागातील सेवा निवृत्त होणाऱ्या ४१ कर्मचा-यांच्या सेवा निवृत्तीनिमित्त



कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व आसवनी विभागातील कर्मचा-यांचा सेवा निवृत्तीनिमित्त सत्कार समारंभ प्रसंगी कारखान्याचे चेअरमन आ.आशुतोष काळे, समवेत व्हा.चेअरमन प्रवीण शिंदे, संचालक मंडळ व पदाधिकारी.

कर्मचाऱ्यांचा कुटुंबासह आयोजित करण्यात आलेल्या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, आपल्या कारखान्याने आणि उद्योग समूहाने आजवर जी प्रगती केली, जे यश मिळवले, जे पुरस्कार मिळवले, त्या प्रत्येक यशामध्ये तुमच्या कष्टांचा, निष्ठेचा आणि प्रामाणिकपणाचा मोठा वाटा आहे.

तुमचे प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद नेहमीच या उद्योग समूहाच्या आणि काळे परिवाराच्या पाठीशी राहिले आहेत. आपणापैकी बहुतांश कर्मचाऱ्यांनी सेवेबरोबरच स्व.माजी खासदार कर्मवीर शंकररावजी काळे साहेब, माजी आमदार अशोकदादा काळे व मला देखील सामाजिक, राजकीय वाटचालीत मोलाची साथ दिली त्यामुळे मला जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली. सेवानिवृत्ती ही नोकरीची असते; नात्याची कधीच नसते. तुम्ही या कारखान्याचे आणि काळे परिवाराचे अविभाज्य घटक होता, आहात आणि कायम राहाल. या संस्थेचे दरवाजे तुमच्यासाठी नेहमीच खुले राहतील. सेवा संपली असली तरी आपले नाते कायम राहील. यापुढील आयुष्यात आवडी-निवडी जपा, कुटुंबाला वेळ द्या, नातवंडांसोबत खेळत आयुष्याचा आनंद घ्या. या प्रसंगी कारखान्याचे व्हा.चेअरमन प्रविण शिंदे, संचालक सुधाकर रोहोम, दिलीपराव बोरनारे, सूर्यभान कोळपे, डॉ.मच्छिंद्र बर्डे, शंकरराव चव्हाण,राजेंद्र घुमरे, सचिन चांदगुडे, श्रीराम राजेभोसले, राहुल रोहमारे, अनिल कदम, अशोक मवाळ, सुनील मांजरे, मनोज जगझाप, वसंतराव आभाळे, सुरेश जाधव, विष्णु शिंदे, दिनार कुदळे, प्रशांत घुले, गंगाधर औताडे, श्रावण आसने यांचेसह कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबासाहेब सय्यद, असि.सेक्रेटरी संदीप शिरसाठ, लेबर ऑफिसर दीपक निंबाळकर तसेच विविध खात्यांचे प्रमुख पदाधिकारी यांचेसह निवृत्त कर्मचारी आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तविक सेक्रेटरी बाबासाहेब सय्यद यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन असि.सेक्रेटरी संदीप शिरसाठ यांनी केले तर आभार व्हा.चेअरमन प्रवीण शिंदे यांनी मानले.

## पान १ वरुन

## नगर-दौंड महामार्गावर दोन ट्रक समोरासमोर धडकल्या

याबाबत माहिती अशी की, नगर दौंड महामार्गावर खंडाळा परिसरात माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांच्या घरासमोर हा भीषण अपघात झाला. एक मालट्रक (क्र. एमएच १६ एई ०८६०) नगर एम आयडीसी मधील कंपनी मधून लोखंडी जॉब घेवून दौंड कडे चालला होता. तर दुसरा मालट्रक(क्र.एमएच १८ बीझेड ७३५२) कापडाचे गठ्ठे घेवून दौंड कडून नगर मार्गे धुळ्याकडे चालला होता.पहाटेच्या सुमारास दोन्ही मालट्रकची समोरासमोर धडक झाली. अपघाचा मोठा आवाज आल्यानंतर कार्ले कुटुंबीय व परिसरातील नागरिक मदतीसाठी धावले. नगरच्या मालट्रक चा चालक सोमनाथ नागरगोजे (रा. वडगाव, ता. पाथर्डी) हा केबिनच्या काचा फोडून बाहेर पडला. तर धुळ्याकडे चाललेल्या ट्रक चालक संजय दावर (रा.शिरपूर, सेंदवा, मध्यप्रदेश) यास संदेश कार्ले व इतरांनी केबिन मधून बाहेर काढत तो गंभीर जखमी असल्याने स्वतःच्या गाडीतून उपचारासाठी नगरला पाठविले.

अपघातानंतर काही वेळात एका ट्रकच्या इंधनाच्या टाकीचा स्फोट होवून दोन्ही वाहनांना मोठी आग लागली. कार्ले यांनी तात्काळ अहिल्यानगर महापालिकेच्या अग्निशमन विभागाला व पोलिसांना कळवले. मालट्रक मध्ये कापड झाल्याने आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. तातडीने अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी आग विझविण्याचे प्रयत्न सुरु केले. कार्ले यांनी त्यांच्या शेतातील वीज पंप सुरु करून या गाड्यांना पाण्याचा पुरवठा केला. एक ते दीड तासांच्या परिश्रमांनंतर आग विझली. मात्र तो पर्यंत दोन्ही वाहने आणि त्यातील साहित्य जळून खाक झाले होते. नगर तालुका पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत अपघात ग्रस्त वाहने जेसीबीच्या सहाय्याने बाजूला करत वाहतूक सुरळीत केली.

## तलवारीने दोन्ही हाताचे पंजे तोडले!

त्यावेळी आपला जीव वाचवण्यासाठी त्यांनी जवळील सुपेकर यांच्या घरातआश्रय घेतला. मात्र, हल्लेखोरांनी तेथेही घुसून हल्ला सुरूच ठेवल्याचा आरोप आहे.या घटनेदरम्यान सुपेकर घरातील एक महिला प्रचंड घाबरल्याने बेशुद्ध पडली. तिला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचारानंतर शुद्धीवर आल्याची माहिती आहे. गंभीर जखमी रोहिदास दांगडे यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत.जखमी रोहिदास हरिभाऊ दांगडे याना सुरुवातीला श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल करण्यात आले. म त्र त्यांची प्रकृती चिंताजनक बनल्याने त्यांना पुढील उपचारासाठी तातडीने पुणे येथे हलविण्यात आले आहे. याप्रकरणी घटनास्थळी मोठ्या प्रमाणात फौजफाटा दाखल झाला असून या प्रकरणी जीव मारण्याचा प्रयत्न तसेच दोन्ही हातांचे पंजे तोडल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात जखमीच्या मुलीच्या फिर्यादीवरून चौघावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे. घटनेमुळे शहरात भीती व तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## गांजा तस्करी उघड...६० हजारांच्या मुद्देमालासह एक अटक

हा मनोविकारावर परिणाम करणारा अंमली पदार्थ विशाल पारखे याने कोणत्याही परवान्याशिवाय बेकायदेशीरपणे स्वतःच्या ताब्यात ठेवला होता. पोलिसांनी ६० हजार रुपयांचा हा मुद्देमाल जप्त करून आरोपीला अटक केली आहे. या कारवाईची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नितीन देशमुख, पो. उ. नि. गणेश देशमुख यांनी तातडीने घटनास्थळाला भेट दिली. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस करत आहेत. शहरात अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## मोशी दुर्घटना : इमारतीतून ८ मृतदेह बाहेर काढले

संबंधित अधिकाऱ्यांना पाठवल्या होत्या. त्यावर का उपाययोजना करण्यात आल्या नाही. आज ज्या पद्धतीने बचाव कार्य सुरू आहे, त्या पद्धतीने दोन दिवस काम झालं नाही’, असा नागरिकांचा आरोप आहे. ’कचऱ्याचा ढीग किती उंचीपर्यंत असावा, याची काही एसओपी असेल ना? चुकीचं कोणी उल्लंघन करत असेल तर त्याची जबाबदारी त्यांनी घेतली पाहिजे ना, त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. सदोष म नुष्यवधाचा गुन्हा दाखल केला पाहिजे’, अशी मागणीही नातेवाईकांनी केली आहे.

# अवैध दारू,जुगारामुळे मांग-गारुडी समाज उध्वस्त पोलिस व ग्रामपंचायतीच्या भूमिकेवर रिपाईचा सवाल

**सरपंच नामदेव शिंदे म्हणाले...**
‘‘आश्वी बुद्रुकमधील अतिक्रमण हटाव मोहीम पूर्णपणे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून राबविण्यात आली आहे. दोन विशेष ग्रामसभा, ग्रामपंचायत ठराव तसेच संबंधित प्रशासकीय परवानग्या घेतल्यानंतरच कारवाई करण्यात आली. कोणत्याही समाजाला लक्ष्य करण्याचा हेतू नसून संपूर्ण गावातील अतिक्रमणे टप्प्याटप्प्याने हटविण्यात येणार आहेत. संबंधितांना पूर्वसूचना व लेखी नोटिसा देण्यात आल्या होत्या. मोकळ्या झालेल्या जागेवर पदपथ व विकासकामे करण्यात येतील. ग्रामस्थांनी अफवांवर विश्वास न ठेवता गावाच्या विकासासाठी प्रशासनाला सहकार्य करावे.‘‘



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** । आश्वी बुद्रुक येथील मांग-गारुडी वस्ती जवळ व परिसरात अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अवैध दारू, मटका व जुगाराच्या धंद्यांमुळे संपूर्ण समाजाची तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या गर्तेत ढकलली जात असल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (रिपाइ) संगमनेर तालुकाध्यक्ष आशिष शेळके यांनी केला आहे. वारंवार तक्रारी करूनही संबंधित अवैध धंद्यांवर कारवाई होत नसल्याने पोलिस प्रशासन आणि ग्रामपंचायतीच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. समाज उद्ध्वस्त करणाऱ्या अवैध व्यवसायांकडे दुर्लक्ष केले जाते, मात्र गरीबांच्या घरांवरील शौचालये व बाथरूम तोडण्यासाठी प्रशासन तत्पर होते, ही दुहेरी भूमिका असल्याचा आरोप त्यांनी केला. शेळके म्हणाले की, मांग-गारुडी समाजातील अनेक तरुण व्यसनाच्या आहारी जाऊन अकाली मृत्युमुखी पडले आहेत. अवैध धंदे बंद करण्याऐवजी प्रशासन गरीबांवर कारवाई करत असल्याने संताप वाढत आहे. संबंधित अवैध व्यवसायांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.दरम्यान, आश्वी बुद्रुक ग्रामपंचायतीने अतिक्रमण हटाव मोहिमेत मांग-गारुडी समाजाच्या शौचालय व बाथरूमची तोडफोड केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही कारवाई अन्यायकारक असल्याचा दावा करत रिपाईने आश्वी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. अन्यथा मोठा जनआंदोलन छेडण्याचा इशाराही रिपाईने दिला आहे.

## सचिन जगदाळे यांची कुंभार समाज विकास संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : ’नवयुवक कुंभार समाज विकास संस्था, महाराष्ट्र राज्य’च्या जिल्हाध्यक्षपदी सचिन निवृत्ती जगदाळे यांची निवड करण्यात आली आहे. संस्थापक अध्यक्ष निलेश राऊत यांनी ही घोषणा केली. या निवडीबद्दल जनसेवा मंडळाच्या वतीने जगदाळे यांचा सत्कार करण्यात आला. समाजाच्या उन्नतीसाठी व समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विविध मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार जाहीर

## ज्ञानेश्वर उद्योग समूहाकडून फुलारी यांचा सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे कामगार संचालक तथा वरिष्ठ डिस्टिलरी केमिस्ट सुखदेव फुलारी यांना महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळामार्फत देण्यात येणारा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्ञानेश्वर उद्योग समूहाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कारखान्याच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची सभा शुक्रवारी (दि. १०) कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आ. नरेंद्र घुले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सुखदेव फुलारी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी फुलारी यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचे, कामगार हितासाठी केलेल्या योगदानाचे तसेच तांत्रिक क्षेत्रातील कार्याचे कौतुक करत पुरस्काराबद्दल अभिनंदन केले. यावेळी उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे, संचालक पंडितराव भोसले, अशोकराव मिसाळ, डॉ. नारायण म्हस्के, जनार्धन कदम, मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, ॲड. हिम्मतसिंह देशमुख, अमोल अभंग, विकास नन्नवरे, संतोष पावसे, जनार्दन शेळके, काशिनाथ नवले, दत्तात्रय काळे, अशोक तानवडे, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, सरव्यवस्थापक रविंद्र मोटे, तांत्रिक सल्लागार ए. बी. खरड, एम. एस. मुरकुटे, एस. डी. चौधरी, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के, मुख्य शेतकी अधिकारी सुरेश आहेर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमात फुलारी यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## जिल्हा शिक्षक सहकारी बँकेच्या नेवासा शाखेतील बाबासाहेब कदम सेवानिवृत्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : अहिल्यानगर जिल्हा शिक्षक सहकारी बँकेच्या नेवासा शाखेतील बाबासाहेब वसंतराव कदम हे ३८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.नेवासा तालुक्यातील देवगाव येथे झालेल्या सेवापूर्ती कार्यक्रम सोहळयात विविध संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.




यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी सत्कार मूर्ती बाबासाहेब कदम व शुभांगी कदम यांचा शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांच्या हस्ते व माजी चेअरमन संतोष दुर्शिंगे, शिक्षक बँकेचे संचालक रामेश्वर चोपडे,माजी चेअरमन पांडुरंग काळे, बँकेचे मुख्य कार्यकारी जगताप, यांच्या उपस्थितीत जिल्हा शिक्षक बँकेच्या उत्कर्षासाठी केलेल्या कार्याचा गौरव सेवापूर्ती निमित्ताने करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हयातील सर्व नेते मंडळी नेवासा तालुक्यातील शिक्षक बँकेचे सभासद,शिक्षक बांधव, नातेवाईक मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्याधिकारी दिघेंची बदनामी खपवून घेतली जाणार नाही : उपनगराध्यक्ष अभय शेळके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : शिर्डी नगर परिषदेचे मुख्याधिकारी सतीश दिघे यांच्याविरोधात करण्यात येत असलेली वैयक्तिक टीका आणि बदनामी सहन केली जाणार नाही, असा इशारा उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी पत्रकार परिषदेत दिला.

शहरातील १२ चारी भूमिगत करून त्यावर रस्ता व सुशोभीकरणाचे काम नगर परिषदेमार्फत सुरू आहे. या कामाला स्थानिक नागरिकांनी आक्षेप घेतल्यानंतर डॉ. सुजय विखे यांच्या मध्यस्थीने अंतिम निर्णय होईपर्यंत काम स्थगित ठेवण्यात आले होते. दरम्यान, अपघात टाळण्यासाठी रस्त्यालगतच्या खड्ड्यांमध्ये मुरूम टाकण्याचे काम सुरू असताना काही तरुणांनी व्हिडिओ चित्रीकरण करून मुख्याधिकारी दिघे यांच्याबाबत आक्षेपार्ह शब्दप्रयोग केल्याचा



आरोप शेळके यांनी केला.

मुख्याधिकारी चुकीचे वागत असतील तर त्यांना जाब विचारण्याचा अधिकार सर्वांना आहे. मात्र विकासकामे पुढे नेणाऱ्या अधिकाऱ्याचा अपमान करणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कायदा हातात घेऊन वातावरण बिघडविणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

या प्रकरणावर सोमवारी डॉ. सुजय विखे यांच्या उपस्थितीत चर्चा करून तोडगा काढला जाईल. तोपर्यंत नागरिकांनी शांतता राखावी, असे आवाहन शेळके यांनी केले.

## गंगापूर येथे युवकाची गळफास घेत आत्महत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**गंगापूर** : शहरातील मारवाडी गल्ली येथे ३० वर्षीय युवकाने राहत्या घरी पंख्याला वायरच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (११ जुलै) दुपारी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जीवन दत्तू चव्हाण (वय ३० वर्ष) यांनी राहत्या घरात पंख्याला वायर बांधून गळफास घेतला. नातेवाईकांनी त्यांना तातडीने गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. त्याच्या पश्चात आई-वडील पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू क्रमांक ३८/२०२६ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १९४ अन्वये नोंद करण्यात आली आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असून, पुढील तपास पोहे का एन आर दुलत करत आहे.

## सडे गावात सीईओ आनंद भंडारी यांचा मुक्काम व विकासकामांची पाहणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यातील थेट संवाद अधिक प्रभावी व्हावा तसेच ग्रामीण विकासकामांना चालना मिळावी या उद्देशाने अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी राहुरी तालुक्यातील सडे गावाला सदिच्छा भेट देत रात्रीचा मुक्काम केला. त्यांच्या मुक्कामामुळे ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



गावात आगमनानंतर पारंपरिक पद्धतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. दुसऱ्या दिवशी पहाटे सहा वाजताच भंडारी यांनी गावातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, जलसंधारणासाठी करण्यात आलेली सीडी वर्कची कामे तसेच पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला.

ामपंचायतीने राबविलेल्या पाच हजार नारळ वृक्ष लागवड मोहिमेचे त्यांनी विशेष कौतुक केले. ग्रामस्थांसाठी सुरू करण्यात आलेल्या मोफत पिठाच्या गिरणीचा उपक्रम, अमरधाम परिसराचे सुशोभीकरण, नदीवरील दर्जेदार सीडी वर्क तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या कॉंक्रिट रस्त्यांचीही त्यांनी पाहणी केली.

यावेळी बोलताना भंडारी म्हणाले, ‘‘सडे ग्रामपंचायतीने शासकीय निधीचा नियोजनबद्ध आणि पारदर्शक वापर करून गावाचा कायापालट केला आहे. पर्यावरणपूरक उपक्रमांपासून पायाभूत सुविधांपर्यंत सर्वच कामे दर्जेदार असून, सडेचा विकास पॅटर्न इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरेल.‘‘

दौऱ्यादरम्यान त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व आवश्यक मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, युवक, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सीईओंच्या या भेटीमुळे सडे ग्रामपंचायतीच्या विकासकामांना आणखी बळ मिळणार असल्याचा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## निधन वार्ता

### नेमीचंद चुडीवाल



**अहिल्यानगर** : येथील दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ सदस्य नेमीचंद चुनीलाल चुडीवाल (वय ८९) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, तीन भाऊ - भागचंद, सुभाष, अशोक चुडीवाल तसेच त्यांची मुलगी सूरज व जावई महावीर थोलिया ( वैजापूर ) व नातवंडे असा परिवार आहे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME FARAJ SARFARAJ KHAN (NAME AS PER SCHOOL DOCUMENTS ) TO NEW NAME AS FARAJ SARFRAJ KHAN VIDE AADHAR NO.4729 0199 4007

**CHANGE OF NAME**

I SARFRAZ NAWAB KHAN FATHER OF FAIM SARFRAZ KHAN HAVE CHANGED MY SONS OLD NAME FAIM SARFARAJ KHAN (NAME AS PER SCHOOL DOCUMENTS ) TO NEW NAME AS FAIM SARFRAZ KHAN VIDE AADHAR NO.2199 9140 7042

# जास्त नफ्याचे आमिषाने ३.९६ लाखांची फसवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : शेअर मार्केटमध्ये अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत शहरातील एका व्यक्तीची ३ लाख ९६ हजार ८५१ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर भामट्यांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजगोपाल गवळी (वय ३०, रा. डीपी रोड, वैजापूर) हे खासगी कंपनीत व्यवस्थापक (मॅनेजर) म्हणून कार्यरत असून, गेल्या अनेक वर्षांपासून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करत आहेत. जानेवारी २०२६ मध्ये त्यांनी गुगलवर गुंतवणुकीविषयी माहिती शोधत असताना बार्क्लेज इन्व्हेस्टमेंट बँक या नावाची एक लिंक पाहिली. त्या लिंकवर क्लिक केल्यानंतर स्वतःला कंपनीची कर्मचारी सानिया जोशी असल्याचे सांगणाऱ्या महिलेने व्हॉट्सॲपडरे त्यांच्याशी संपर्क साधला.

संबंधित महिलेने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे सांगून विविध बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने एकूण ६ लाख २५ हजार रुपये जमा करण्यास सांगितले. त्यानुसार राजगोपाल गवळी यांनी त्यांच्या आयसीआयसीआय बँक आणि बँक ऑफ इंडिया खात्यांतून विविध खात्यांमध्ये ऑनलाइनपद्धतीने ही रक्कम वर्ग केली.काही दिवसांनंतर त्यांनी गुंतवलेली रक्कम आणि त्यावरील नफा परत घेण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी २१ लाख ५० हजार ४०० रुपयांचा लाभ मिळवण्यासाठी आणखी १० लाख ९३ हजार १०४ रुपये जमा करावे लागतील, असे सांगितले. त्यामुळे गवळी यांना संशय आला. त्यांनी संबंधित वेबसाइटची पडताळणी केली असता ती बंद झाल्याचे आढळून आले.यानंतर त्यांनी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय सायबर हेल्पलाइ न १९३० वर तक्रार नोंदवली. तक्रारीनंतर सायबर पोलिसांनी २ लाख २८ हजार १४८ रुपये इतकी रक्कम होल्ड करण्यात यश मिळवले. मात्र उर्वरित ३ लाख ९६ हजार ८५१ रुपये परत मिळू शकले नाहीत. त्यामुळे त्यांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. पीडिताच्या तक्रारीवरून वैजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# चार महिन्यांनी मिळाला ’नॅटग्रीड’च्या मदतीने वडिलांचा ठाव

## दौंड रेल्वे पोलिसांची संवेदनशीलता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : एखादी व्यक्ती बेपत्ता झाल्यानंतर तिचा शोध लागावा, अशी कुटुंबीयांची अखंड आशा असते. मात्र चार महिन्यांपूर्वी घरातून निघून गेलेल्या ७२ वर्षीय नारायणस्वामी चिन्नास्वामी यांच्या कुटुंबीयांसाठी ही प्रतीक्षा अखेर अश्रूंनी भरलेल्या सत्यात बदलली. दौंड लोहमार्ग पोलिसांनी अत्याधुनिक ’नॅटग्रीड’ तंत्रज्ञानाचा वापर करून एका बेवारस मृताची ओळख पटवत तमिळनाडूमधील कुटुंबापर्यंत माहिती पोहोचविली.

दि. २६ मार्च २०२६ रोजी भिगवण रेल्वे स्थानक परिसरात गंभीर आजारी अवस्थेत एक वृद्ध आढळून आला होता. रेल्वे पोलिसांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. पुढे बारामती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू असतानाच ८ एप्रिल रोजी त्यांचे निधन झाले. उपचारादरम्यान ते केवळ ‘‘नारायण स्वामी‘‘ एवढेच नाव सांगू शकले; मात्र पत्ता किंवा कुटुंबीयांची कोणतीही माहिती देऊ शकले नाहीत.

मृताची ओळख पटविण्यासाठी रेल्वे पोलिसांनी छायाचित्र प्रसिद्ध करणे, बोटांचे ठसे, डीएनए नमुने, विविध पोलीस ठाण्यांशी पत्रव्यवहार तसेच सोशल मीडियावर माहिती प्रसारित करणे असे सर्व प्रयत्न केले; मात्र यश मिळाले नाही.

अखेर दौंड लोहमार्ग पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस हवालदार उमेश कोंगे यांनी ’नॅटग्रीड’ प्रणालीवर मृताचे छायाचित्र अपलोड केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने या प्रणालीने छायाचित्र तमिळनाडूमधील नोंदीशी जुळवून दिले आणि मृताची ओळख कोईमतूर जिल्ह्यातील नारायणस्वामी चिन्नास्वामी अशी निश्चित झाली.

त्यानंतर संबंधित पोलिस ठाण्याच्या मदतीने कुटुंबीयांशी संपर्क साधण्यात आला. मुलगा प्रदीपकुमार यांनी छायाचित्र पाहताच ते आपले वडील असल्याची ओळख पटविली. विशेष म्हणजे, त्यांनी वडील बेपत्ता झाल्याची तक्रारही यापूर्वी नोंदविली होती. ९ जुलै रोजी कुटुंबीय दौंड येथे आल्यानंतर पोलिसांनी त्यांना संपूर्ण घटनाक्रम सांगितला व अंत्यसंस्कार झालेल्या ठिकाणी नेले. त्या क्षणी कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले. त्यांनी पोलिसांच्या संवेदनशीलतेबद्दल आणि अथक प्रयत्नांबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली.

प्रभारी अधिकारी राजेंद्र गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक हिमालय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बी. बी. आहेर आणि पोलीस हवालदार उमेश कोंगे यांनी ही उल्लेखनीय कामगिरी पार पाडली. आधुनिक तंत्रज्ञान आणि मानवी संवेदनशीलतेचा सुंदर मिलाफ घडवत रेल्वे पोलिसांनी एका कुटुंबाला त्यांच्या हरवलेल्या व्यक्तीचे उत्तर मिळवून दिले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

रविवार दि .१२ जुलैं २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२९<br>१५६<br>११० | २-६ | १२३<br>३६७<br>५५६ | जोड<br>२४-८६-०३-<br>९५-६७ |

### कल्याण

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १९०<br>४६०<br>२८० | ०-५ | १४०<br>२३०<br>७८० | जोड<br>०१-२५-४३-<br>७९-५८ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १३०<br>१४९<br>११२ | ४-२ | १३८<br>२४६<br>२२८ | जोड<br>४०-६२-७१<br>३९-२५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 259 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 379 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 309 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 460 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

# बुरुडगाव कचरा डेपो आग प्रकरण

## महापालिका प्रशासनाने आत्मपरीक्षण करावे ; भावी पिढीला नरकात लोटण्याचे पाप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या बुरुडगाव येथील कचरा डेपोला नेहमीच आग लागते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण तर होतेच परंतु आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात येत आहे. काही वर्षांपूर्वी बुरुडगाव येथील स्थानिक गावकरी कचरा डेपोमुळे होणाऱ्या त्रासाविरोधात आंदोलन करायचे. मात्र आता कचरा डेपो मधून महिनाभरापासून धुराचे लोट निघत आहेत. तरी देखील स्थानिक नागरिक गप्प आहेत.

गावाबाहेरील पर्यावरण प्रेमी कचरा डेपोच्या आगीची व धुराची दखल घेऊन जिल्हा प्रशासन व महापालिका प्रशासनाकडे तक्रार करत आहेत. मात्र स्थानिक नागरिकांचे मौन मात्र आश्चर्यजनक आहे.

कचरा डेपोमध्ये जमा होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. तरीदेखील तेथे कचऱ्याला आग लागून मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होते. ही बाब महापालिका प्रशासनाला



माहित नाही असे काहीही नाही.

कचरा डेपोतील सर्व घडामोडी महापालिका प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकारी, विभाग प्रमुख याचबरोबर पदाधिकारी यांना सर्वांना माहीत आहे. अनेक सामाजिक कार्यकर्ते याबाबत वर्षानुवर्षे तक्रारी करून थकले. परंतु या प्रदूषणात व परिस्थितीत काहीच बदल होत नाही. कचरा प्रक्रियेसाठी येणारा पैसा कागदोपत्री खर्च करून कोट्यावधीचा निधी अक्षरशः गिळला जातो. भ्रष्टाचार ही न थांबणारी बाब आहे. परंतु कोणत्या बाबतीत आणि किती प्रमाणात भ्रष्टाचार करावा याबाबत महापालिका प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. शासनाने घनकचरा हाताळणीसाठी कठोर नियम केलेले आहेत. मात्र ते फक्त नागरिकांसाठीच आहेत का ? असा प्रश्न या कचरा डेपोतील धुरामधून निर्माण झाला आहे. सर्वसामान्य नागरिकांनी कचऱ्याच्या बाबतीतील नियम मोडले तर त्यांना तात्काळ दंड होतो. इथे मात्र महिनाभरापासून कचऱ्याचे ढीग पेटून वायू प्रदूषण होत आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई होत नाही. कारण हे सर्व संगनमताने सुरू असून सगळे एकमेकांचा बचाव करतात. प्रदूषणासंदर्भातील पर्यावरणप्रेमींच्या तक्रार अर्जांना थेट कचरा डेपो दाखवला जातो.

अशा प्रकारच्या भ्रष्टाचारातून निर्माण झालेल्या वाढत्या प्रदूषणामुळे दिवसेंदिवस ढासळत चाललेला निसर्गाचा असमतोल आपल्या भावी पिढीला नरकात लोटत आहे. आणि याला महापालिका प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी हेच जबाबदार आहेत. त्यामुळे भ्रष्टाचारातून निर्माण झालेली कचरा डेपोतील आग व त्यामुळे होणारे वायू प्रदूषण ही बाब गांभीर्याने घेऊन आपण नेमके काय करत आहोत ? याचे आत्मपरीक्षण महापालिका प्रशासन अधिकारी व पदाधिकारी यांनी करावे असे आवाहन हरिभुमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# द•ख•ल

## नगर कॉलेजच्या प्र.प्राचार्यपदी निवडीबद्दल डॉ. कुलकर्णींचा सत्कार

**अहिल्यानगर :** अहमदनगर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल डॉ.अभिजित कुलकर्णी यांची आज सामाजिक कार्यकर्ते



व शकील जहागीरदार यांनी सदिच्छा भेट घेतली. व त्यांचा निवडीबद्दल सत्कार करून पुढील वाटचालीस व शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन यावेळी प्रभारी प्रा. डॉ.अभिजित कुलकर्णी यांनी केले. या सदिच्छा भेटीबद्दल त्यांनी शकील जहागीरदार यांचे आभार मानले.

## पत्रकार कुरुमकर यांचा गौरव



**लिंपणगाव :** ज्येष्ठ पत्रकार व लिंपणगाव सेवा संस्थेचे सभासद नंदकुमार कुरुमकर हे शिक्षण संस्थेच्या प्रदीर्घ सेवेतून नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्या प्रितर्थ लिंपणगाव सेवा संस्थेच्या वतीने चेअरमन रामभाऊ टुले व ज्येष्ठ संचालक संभाजी लष्करे यांच्या हस्ते गौरव करून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी बोलताना सेवानिवृत्त सचिव दत्तात्रय खळदकर यावेळी बोलताना म्हणाले की, कुरुमकर हे छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या ३८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांनी ज्ञानदान सारख्या पवित्र क्षेत्रात आपले प्रामाणिकपणे योगदान दिले. त्यांच्या या कार्यकर्तृत्वामुळे त्यांना राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष वाल्मीक सुरासे यांनी राज्य प्रसिद्धी प्रमुख म्हणून निवड केली. याबरोबरच कुरुमकर यांचे लिंपणगाव सेवा संस्थेला देखील मोलाचे योगदान लाभत आहे. असे गौरवउद्गार खळदकर यांनी काढले.

## व्यापारी मंडळाकडून वारकऱ्यांना महाप्रसाद



**अहिल्यानगर :** नगरमध्ये आलेल्या त्र्यंबकेश्वर येथील निवृत्ती महाराज आषाडी वारीला पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडीला मार्केटयार्ड व्यापारी मित्र मंडळच्या वतीने पूर्ण फराळ देण्यात आला गेली १४ वर्षे हा उपक्रम चालू आहे अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष अमोल पोखरणा यांनी दिली. मार्केटयार्ड मधील सर्व व्यापारी एकत्र येऊन वारकर्यांना आज एकादशी असल्याने फराळ देण्यात आला,यामध्ये उपवासाचे पाच पदार्थ होते. हा पूर्ण फराळ चा लाभ सुमारे १९ हजार च्या वर वारकर्यांनी घेतला. दुपारी १ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यत फराळ वाटप चालू होते, यावर्षी प्रशासनाने उत्तम सहकार्य केले व खुप चांगली व्यवस्था ठेवली त्यामुळे सर्व व्यपाऱ्यानी मनपाचे कौतुक केले. कार्यक्रम यशश्वी करण्यासाठीसर्व मार्केट परिसरातील सर्व व्यापाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## राजस्थानी मल्टीस्टेटकडून फसवणूक चेअरमनसह ७ जणांवर गुन्हा

**अहिल्यानगर :** जास्त व्याजाचे आमिष दाखवून एका दाम्पत्याची तब्बल ६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगरमध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात राजस्थानी मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या चेअरमनसह ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाईपलाईन रोडवरील शाखेत आयोजित ग्राहक मेळाव्यात १२.१२ टक्के व्याजदराचे आमिष दाखवून फिर्यादी महिला व तिच्या पतीने कष्टाची ६ लाख रुपयांची रक्कम मुदत ठेव म्हणून गुंतवली होती. मुदत संपल्यानंतरही व्याजासह एकूण ७ लाख २७ हजार २६० रुपये न देता पतसंस्थेने हात वर केले. जेव्हा फिर्यादीने परळी वैजनाथ येथील मुख्य कार्यालयात आणि चेअरमनच्या घरी जाऊन पैशांची मागणी केली, तेव्हा त्यांना गुंडांमार्फत हुसकावून लावून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या फसवणूक प्रकरणी पोलिसांनी शाखाधिकारी मिथुन गांधी, कॅशियर रुक्मिणी साळुंके, लेखनिक तृप्ती गोंगे, अर्जुन वाव्हळे, कर्मचारी वैभव नावडकर, चेअरमन चंदुलाल बिहाणी आणि त्यांची मुलगी पूजा बिहाणी यांच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल केला आहे. सध्या ही पतसंस्था बंद असून सर्व आरोपी फरार आहेत. पोलीस कर्मचारी रमेश शिंदे यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण करीत आहेत.

## उसनवारीचे पैसे मागितल्याने तरुणाला मारहाण; गुन्हा दाखल

**अहिल्यानगर :** उसने दिलेले पैसे परत मागितल्याचा राग मनात धरून एका तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार अहिल्यानगर येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल सुरेश घाटेशाही (वय २८, रा. गवळी वाडा, भिंगार) असे मारहाण झालेल्या फिर्यादी तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी सर्फराज उर्फ अंडा बाबा शेख (रा. आलमगीर, भिंगार) या आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमोल घाटेशाही यांनी आरोपी सर्फराज याला काही पैसे उसने दिले होते. ६ जुलै रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास अमोल हे स्टेट बँक चौकात आले असता, त्यांनी आरोपीकडे आपल्या हक्काच्या पैशांची मागणी केली. याचाच राग आल्याने आरोपी सर्फराज याने अमोल यांना रस्त्यात गाठून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने आरोपीने अमोल यांच्या कानशिलात लगावून त्यांना बेदम मारहाण केली. तसेच 'जर पुन्हा पैसे मागितले तर तुला जीवे मारून टाकीन' अशी धमकी दिली. या घटनेनंतर अमोल यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार करत आहेत.

# आ.कर्डिले यांच्या पुढाकाराने पाणीटंचाईवर दिलासा

## १९ गावांतील ग्रामस्थांसह वारकऱ्यांमध्ये समाधान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्यात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाल्याने अनेक गावांतील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तालुक्यातील १९ गावांना पंचायत समितीमार्फत टँकरने पाणीपुरवठा केला जात असून या गावांसाठी दररोज ३३ टँकर खेपा मंजूर आहेत. याशिवाय पंढरपूर वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या सुविधेसाठीही १३ टँकर खेपा मंजूर करण्यात आल्या आहेत.

बुऱ्हाणनगर पाणीपुरवठा योजनेच्या उद्भवावरून हे टँकर भरले जात असताना गेल्या तीन-चार दिवसांपासून तेथील ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्याने पाणी भरण्याची प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली होती. परिणामी १९ गावांतील ग्रामस्थांसह वारीसाठी आलेल्या हजारो वारकऱ्यांनाही पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या



लागत होत्या. अनेक ठिकाणी नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने परिस्थिती गंभीर बनली होती. आ. अक्षय कर्डिले यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तात्काळ परिस्थितीची दखल घेत महानगरपालिकेचे महापौर आणि आयुक्त यांच्याशी सविस्तर चर्चा केली. तालुक्यातील पाणीटंचाईचे गांभीर्य तसेच वारकरी संप्रदायाच्या सोयीचा विचार करून महानगरपालिकेच्या वसंत टेकडी येथील उद्भवावरून टँकर भरण्यास तातडीने परवानगी देण्याची मागणी त्यांनी केली. आ. कर्डिले यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्यानंतर शनिवार महानगरपालिकेच्या वसंत टेकडी येथील उद्भवावरून टँकर भरण्यास सुरुवात झाली. त्यानंतर हे टँकर संबंधित गावांकडे तसेच वारकऱ्यांच्या सेवेसाठी रवाना करण्यात आले. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून विस्कळीत झालेला पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत होण्यास मदत झाली असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. पाणीटंचाईच्या गंभीर काळात आ. अक्षय कर्डिले यांनी तातडीने हस्तक्षेप करून प्रशासनाशी समन्वय साधत पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिल्यामुळे ग्रामस्थांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबली. तसेच पंढरपूरच्या वारीसाठी आलेल्या वारकऱ्यांच्याही पिण्याच्या पाण्याची सोय झाल्याने नागरिकांकडून आ. कर्डिले यांच्या तत्परतेचे व कार्यक्षमतेचे कौतुक केले जात आहे.

# आ. जगताप झाले दिंडीचे वारकरी!




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

### श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या दिंडी सोहळ्याने अहिल्यानगर भक्तिरसात न्हाऊन निघाले

**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या पायी दिंडी पालखी सोहळ्याचे अहिल्यानगर शहरात आगमन होताच आमदार संग्राम जगताप यांनी शेंडी येथे जाऊन दिंडीत सहभाग घेतला. वारकऱ्यांसमवेत पायी चालत त्यांनी भक्तिमय वातावरणाचा आनंद लुटला तसेच पालखीचे स्वागत करून वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना आमदार जगताप म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून शेकडो वर्षांची पालखी-दिंडी परंपरा टाळ-मृदुंगाच्या गजरात संपूर्ण राज्याला भक्तिरसात रंगविते. आपल्याला लाभलेला हा समृद्ध आध्यात्मिक वारसा अखंडपणे पुढे नेण्यासाठी युवकांनी मोठ्या संख्येने या सोहळ्यांत सहभागी व्हावे.

धार्मिकतेतून विधायक विचारांची निर्मिती होते आणि समाजहिताच्या कार्यासाठी आवश्यक ऊर्जा व प्रेरणा मिळते, असे सांगत त्यांनी श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या पायी दिंडी पालखी सोहळ्याचे अहिल्यानगरकरांनी केलेल्या उत्स्फूर्त स्वागताबद्दल समाधान व्यक्त केले. लाखो वारकरी अहिल्यानगर शहरातून मार्गक्रमण करीत असल्याने संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणाने भारावून गेल्याचेही त्यांनी नमूद केले.

# अनामप्रेमच्या विद्यार्थिनींचे गोलबॉल स्पर्धेत यश




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** दिव्यांगांच्या शिक्षण, पुनर्वसन आणि सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेच्या विद्यार्थिनींनी राज्यस्तरीय गोलबॉल स्पर्धेत दमदार कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

पॅरा ब्लाइंड स्पोर्ट्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिनांक २६ ते २८ जून २०२६ दरम्यान उल्हासनगर (मुंबई) येथे आयोजित करण्यात आलेल्या स्टेट लेव्हल गोलबॉल चॅम्पियनशिप मध्ये अनामप्रेमच्या विद्यार्थिनींच्या संघाने आपल्या उत्कृष्ट खेळ, अचूक नियोजन आणि सांघिक समन्वयाच्या बळावर दिमाखदार यश संपादन केले.

स्पर्धेतील पहिल्या सामन्यात अनामप्रेम विरुद्ध मुंबई असा सामना रंगला. या सामन्यात अनामप्रेमच्या संघाने आक्रमक खेळाचे अप्रतिम प्रदर्शन करत तब्बल १९ गोल नोंदवले आणि मुंबईच्या संघावर दणदणीत विजय मिळवला. त्यानंतर झालेल्या अनामप्रेम विरुद्ध नागपूर या दुसऱ्या सामन्यातही विद्यार्थिनींनी आपल्या उत्कृष्ट खेळाची पुनरावृत्ती करत ११ गोल नोंदवले आणि प्रतिस्पर्धी संघावर निर्विवाद वर्चस्व गाजवत विजयी वाटचाल कायम ठेवली.

या यशस्वी संघामध्ये कु. कल्पना कदम, कु. आरती दामोदर, कु. भाग्यश्री उत्तेकर आणि कु. राधा यादव या विद्यार्थिनींचा समावेश होता. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव, जिद्द आणि सांघिक भावनेच्या बळावर त्यांनी हे उल्लेखनीय यश संपादन करत अनामप्रेम संस्थेचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात उंचावले आहे. या संघाच्या विजयासाठी डॉ. मेघना मराठे, अभय रायकवाड, आनंद माळवे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संत निवृत्तीनाथ दिंडी निघाली पंढरीला....



संत निवृत्तीनाथ दिंडीचे डोंगरगण येथे न्यू इंग्लिश स्कूलच्या वतीने ऋतुजा जालिंदर कदम, महेश भराडिया, प्रा. भुतकर व विद्यार्थी यांनी स्वागत व पूजा केली. डोंगरगण येथे संत निवृत्तीनाथ दिंडीचे सरपंच सर्जेराव मते,जंगले शास्त्री,ग्रामीन पोलीस चे उपअधीक्षक शिरीष वमने, तहसीलदार, अधिकारी व ग्रामस्थांनी केले भव्य दिव्य स्वागत व पूजा केली. अहिल्यानगर जिल्हा पोलीस व एमआयडीसी पोलीस स्टेशन यांच्या वतीने विविध ठिकाणी वारकऱ्यांचे स्वागत व माहिती फलक लावण्यात आले आहेत. ( छाया-महेश कांबळे)

# 'वारकरी माझ्या दारात येतात, मी नशीबवान' : हुंडेकरी

## सलग १४ वर्षे मुस्लिम समाजातील हुंडेकरींकडून सायकल वारीचे स्वागत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर नाशिक ते पंढरपूर अशी सायकल वारी करणाऱ्या वारकरी सायकलपटूंचे अहिल्यानगर शहरात मुस्लिम समाजातील ज्येष्ठ उद्योजक व समाजसेवक हाजी करीमशेठ हुंडेकरी यांच्या वतीने भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. गेल्या सलग १४ वर्षांपासून सुरू असलेली ही सेवाभावी परंपरा यंदाही कायम राखत हुंडेकरी परिवाराने वारकऱ्यांच्या निवास, भोजन, अल्पोपहार आणि इतर सर्व सोयींची उत्कृष्ट व्यवस्था केली. धर्म, जात आणि पंथाच्या पलीकडे जाऊन माणुसकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्या वतीने गेल्या चौदा वर्षांपासून नाशिक ते पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात येते. सुरुवातीला अवघ्या ७५ सायकलपटूंनी सुरू झालेल्या या वारीत आज तब्बल ३५० सायकलपटू सहभागी होत आहेत. यामध्ये ५५ महिला सायकलपटूंचा समावेश असून, आठ दृष्टीहीन आणि एक पाय नसलेले तीन दिव्यांग टँडेम (डबल सीट)



सायकलच्या माध्यमातून ही वारी पूर्ण करत आहेत. यंदाच्या वारीत तब्बल २०० नवीन सायकलपटूंनी सहभाग नोंदविला आहे.

या स्वागत सोहळ्यात नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनचे अध्यक्ष अमित घुगे, वारी प्रमुख दविंदरसिंग भेला, सचिव नितीन कोटकर, सायकल दिंडीचे संस्थापक तथा माजी पोलीस आयुक्त हरीश बैजल, वारी प्रमुख अश्विनी कोंडेकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी पोलीस आयुक्त हरीश बैजल यांनी हुंडेकरी परिवाराच्या सेवाभावाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, २०१४ मध्ये ७५ सायकलपटूंनी सुरू झालेल्या या वारीसोबत हुंडेकरी परिवार सुरुवातीपासून उभा आहे. वारीतील सहभागींची संख्या सातत्याने वाढत असताना 'तीनशे काय, तीन हजार वारकरी आले तरी त्यांची सेवा करू' ही त्यांची उदात्त भावना मनाला स्पर्श करणारी आहे. राष्ट्रीय एकात्मतेचे हे जिवंत उदाहरण असून, त्यांच्या सेवेतून खरी माणुसकी अनुभवायला मिळते.

हाजी करीमशेठ हुंडेकरी यांनीही अत्यंत भावनिक शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.

द•ख•ल

## श्री सद्गुरू शंकर महाराज भजनी मंडळातर्फे वारकऱ्यांना रेनकोट वाटप



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** आषाढी वारीनिमित्त धनकवडी येथील श्री सद्गुरू शंकर महाराज भजनी मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही धनकवडी परिसरात मुक्कामी असलेल्या विविध जिल्ह्यांतील दिंडीतील वारकरी भाविकांना रेनकोट व नाश्ता वाटप करण्यात आला. अविरत पडणाऱ्या पावसात पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये, या सेवाभावी उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शेकडो वारकरी भाविकांनी या उपक्रमाचा लाभ घेत भजनी मंडळाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी भजनी मंडळाचे अध्यक्ष निखिल बाबुदादा वाघमारे,चिन्मय भदे,विठ्ठल चव्हाण,गणेश कपिलेश्वर, गौरव आढागळे, तुषार राजपूत,आर्यवीर चव्हाण,सुरज बांदल,हॉटेल उद्योजक अमित शेट्टी,संदीप तरे,धीरज परदेशी तसेच भजनी मंडळाचे सर्व सदस्य, गुरुबंधू आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

## ओझरच्या पाण्यात 'बॉडी'च्या अफवेमुळे खळबळ; तपासात गादी निघाली



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** ओझर (ता. जुन्नर) येथील पाण्यात एक मृतदेह तरंगत असल्याची माहिती शुक्रवार दि १० जुलै रोजी ओतुर पोलिसांना मिळाल्यानंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते.स्थानिकांनी पाण्याच्या मध्यभागी मृतदेहा सारखी वस्तू तरंगत असल्याचे पाहून ओतुर पोलीस स्टेशनला कळवले. माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, पोलीस हवलदार बाळशीराम भवारी, नरेंद्र गोराणे आणि भरत सूर्यवंशी यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन संशय दूर करण्यासाठी सूर्यवंशी व भवारी यांनी स्थानिकांच्या मदतीने खाजगी बोटीद्वारे पाण्यात जाऊन पाहणी केली. त्यावेळी ती वस्तू मृतदेह नसून गादी असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे पसरलेल्या अफवांमुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली होती. मात्र पोलिसांच्या तत्परतेमुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रथम पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन ओतुर पोलिसांनी केले आहे.

## सहकारविभागाच्याअधिकारी-कर्मचाऱ्यांकडून उपनिबंधक अरुण साकोरे यांचा गौरव




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** सहकार विभागाचे उपनिबंधक अरुण साकोरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी त्यांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ सेवेचा मान्यवरांनी गौरव केला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार आयुक्त दीपक तावरे होते. प्रमुख उपस्थितीत राजेश सुरवसे (अप्पर निबंधक) सचिन रावळ,(अप्पर निबंधक) दादा काळे, (विभागीय सहनिबंधक)रामभाऊ शिर्के, (विभागीय सहनिबंधक ) मिलिंद सोबले ( उपनिबंधक ) तसेच मुख्यालयातील सर्व उपनिबंधक, सहायक निबंधक आणि सहकार विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतात अरुण साकोरे यांनी सुमारे ३२ वर्षांच्या सेवाकाळात विविध ठिकाणी उत्कृष्ट प्रशासन, प्रामाणिकपणा आणि लोकाभिमुख कार्यशैलीचा आदर्श निर्माण केल्याचे सांगितले. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा सहकार विभागाला नेहमीच लाभ झाला असून, त्यांच्या भावी आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी अरुण साकोरे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सपत्नीक सन्मान करण्यात आला.

## संत सटवाजीबाबा दिंडी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** लोणी (ता.आंबेगाव ) येथून श्री संत सटवाजीबाबा दिंडी सोहळ्याचे '' ज्ञानोबा माऊली तुकारामा '' च्या जयघोषात भक्तिमय वातावरणात लोणीकाळभोर मार्ग पंढरपूर कडे प्रस्थान झाले. तत्पूर्वी लाखणगाव येथून आहेल्या दिंडी सोहळ्याचे लोणी ग्रामस्थांनी भक्तीमय वातावरणात स्वागत केले.यावेळी पायी दिंडी सोहळ्यात सहभागी झालेल्या माता भगिनी, वारकरी लोणी गावचे ग्रामदैवत शंभोमहादेवाच्या मंदिरामध्ये हरिपाठ,आरती करून दिंडी सोहळ्याचे प्रस्थान झाले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते उद्धव लंके,रंजना लंके,वैशाली आदक पाटील व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. हा दिंडी सोहळा लोणी काळभोर या ठिकाणी संत तुकाराम महाराजांच्या दिंडी सोहळ्यात सहभागी होणार असून तेथून हा दिंडी सोहळ पंढरपूरकडे मार्गस्थ होईल असे उद्धव लंके यांनी सांगितले.

# आषाढी वारीत महिला उन्नती वारी उपक्रमाद्वारे महिला सक्षमीकरणाचा संदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महिला व बालविकास विभागाच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने आषाढी वारी काळात महिला उन्नती वारी हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ रविवार, १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता पालखी तळ, उरुळीकांचन, पुणे येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते होणार आहे.

आषाढी वारीमध्ये राज्यभरातून लाखो वारकरी सहभागी होत असतात. या मोठ्या लोकसहभागाच्या सोहळ्यादरम्यान महिलांपर्यंत शासनाच्या विविध योजना, महिला सक्षमीकरण, महिला सुरक्षा तसेच महिलांच्या हक्कांविषयीची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने महिला उन्नती वारी हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी मार्गावर डिजिटल चित्ररथांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच महिला व बालकांसाठी असलेल्या शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, महिलांसाठी उपलब्ध विविध हेल्पलाईन्स तसेच महिलांशी संबंधित विविध कायद्यांची माहिती व प्रचार-प्रसिद्धी करण्यात येणार आहे.तसेच पालखी मुक्कामाच्या ठिकाणी लोककला सादरीकरणाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, स्त्री सुरक्षा, सामाजिक प्रश्न तसेच शासनाच्या विविध योजनांवर आधारित प्रबोधनपर कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. या माध्यमातून महिला आयोगाच्या विविध उपक्रमांची तसेच महिलांसाठी उपलब्ध शासकीय सेवांची माहिती लाखो वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. आध्यात्मिक परंपरा आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची सांगड घालणारा महिला उन्नती वारी हा उपक्रम महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता, हक्कांविषयी जागरूकता आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या उपक्रमामध्ये अधिकाधिक वारकरी आणि नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

## केंदूरमध्ये पानातून दिली जाणारी संशयित अपायकारक पावडर जप्त; एकाला अटक



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ :** पानामध्ये मिसळून व्यसनासाठी वापरली जाणारी संशयित अपायकारक पावडर जप्त करत शिक्रापूर पोलिसांनी केंदूर (ता. शिरूर) येथील पऱ्हाडमळा परिसरात धडक कारवाई केली. या प्रकरणी तुषार राहुल पऱ्हाड (वय २६, रा. पऱ्हाडमळा, केंदूर) याला अटक करण्यात आली असून न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक अंकुश कारंडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने छापा टाकला. आरोपीच्या घरामागील पत्राशेडमध्ये ठेवलेल्या बॉक्समधून प्लास्टिकच्या पिशवीत साठवून ठेवलेली उग्र वासाची संशयित पावडर आढळून आली. ही पावडर पानामध्ये मिसळून व्यसनासाठी वापरली जात असल्याचा प्राथमिक संशय आहे.फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या उपस्थितीत पंचनामा करून पावडरचे दोन नमुने रासायनिक विश्लेषणासाठी सीलबंद करण्यात आले. उर्वरित सुमारे ८५ ग्रॅम पावडर जप्त करण्यात आली. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून जप्त केलेला माल तपासासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आहे.आरोपीला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, शिरूर यांच्या न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. पुढील तपास शिक्रापूर पोलीस करीत आहेत.

> **अवैध व्यसनाविरोधात कठोर कारवाई**
> **खायच्या पानामधून व्यसनास प्रवृत्त करणाऱ्या आणि मानवी आरोग्याशी खेळ करणाऱ्या अवैध प्रकारांवर तातडीने कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनी अशा प्रकारांची माहिती पोलिसांना निर्भयपणे द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.**
> **- चंद्रशेखर यादव,**
> पोलीस निरीक्षक, शिक्रापूर पोलीस ठाणे

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक अंकुश कारंडे, सोमनाथ कचरे, धनंजय थेऊरकर व विशाल देशमुख यांनी केली.

## वारकऱ्यांची सेवा हीच विठुरायाची सेवा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### आषाढी वारीत 'चरण सेवा' उपक्रम

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्यावतीने आयोजित 'श्री क्षेत्र पंढरपूर आषाढी वारी चरण सेवा' उपक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भेट देऊन वारकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी वारकऱ्यांची सेवा हीच विठुरायाची सेवा असल्याचे सांगत अशा सेवाकार्यात सहभागी होणे हे मोठे भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे दर्शन घेऊन व आशीर्वाद घेऊन या सेवाकार्यात सहभागी होत असल्याचा विशेष आनंद आहे. वारीत सहभागी होणारे वारकरी भगिनी-बंधू दीर्घ पायी प्रवास करून येथे पोहोचतात. त्यांचा शारीरिक शीण दूर व्हावा, या उद्देशाने राबविण्यात येणारा 'चरण सेवा' उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. वारकरी संप्रदायात प्रत्येकामध्ये माऊलीचे दर्शन घेतले जाते. एकमेकांच्या चरणी नम्रतेने वंदन करण्याची परंपरा ही समतेचा आणि भक्तीचा संदेश देणारी आहे. अशा वारकऱ्यांच्या चरणांची सेवा करण्याची संधी



मिळणे हे मोठे भाग्य असून, विठुरायाच्या भक्तांची सेवा हीच विठ्ठलभक्ती असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमात तरुण स्वयंसेवक मोठ्या समर्पित भावनेने वारकऱ्यांची सेवा करत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. या सेवाकार्यात सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते आणि आयोजकांचे त्यांनी अभिनंदन केले. विशेषतः आमदार श्री. सुनील कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या कार्याचे श्री. फडणवीस यांनी कौतुक केले.ग्रामविकास विभागामार्फत आधुनिक पद्धतीच्या चरण सेवा यंत्रांचीदेखील उपलब्धता करून देण्यात आली असून त्याद्वारे वारकऱ्यांना अधिक चांगली सुविधा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केली मोशी दुर्घटनास्थळाची पाहणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज घटनास्थळी भेट देऊन सुरू असलेल्या शोध व बचावकार्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून बचाव कार्याचा सविस्तर आढावा घेतला तसेच दुर्घटनेत बाधित झालेल्या नागरिकांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला आणि प्रशासनामार्फत सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही दिली.



यावेळी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार सुनील शेळके, माजी आमदार विलास लांडे, महापौर रवी लांडगे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, नगरसेवक विठ्ठल (नाना) काटे, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम व तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी माध्यमांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, मोशी येथे घडलेली दुर्घटना अत्यंत वेदनादायी आणि संवेदनशील आहे. या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांच्या दुःखात शासन सहभागी आहे. राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असतानाही या दुर्घटनेच्या पहिल्या दिवसापासून मी संपूर्ण परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून होते. तातडीने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) घटनास्थळी दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि इतर माध्यमांद्वारे मी

### बचावकार्याचा घेतला आढावा; बाधितांच्या नातेवाईकांशी साधला संवाद

सातत्याने प्रशासनाच्या संपर्कात राहून बचावकार्याचा आढावा घेत होते.

त्या पुढे म्हणाल्या, कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून बाहेर पडणारा विषारी वायू, सततचा पाऊस आणि ढिगाऱ्याची गुंतागुंतीची रचना यामुळे बचावकार्यात काही अडथळे निर्माण झाले. मात्र, अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि प्रशिक्षित पथकांच्या मदतीने शोध व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. दुर्घटनास्थळावरून बाहेर काढण्यात येणारे मृतदेह त्यांच्या नातेवाईकांना सन्मानपूर्वक दाखवावेत, अशा स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. दुर्घटनेच्या कारणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात येईल. चौकशी अहवालानुसार जे कोणी जबाबदार आढळतील त्यांच्यावर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल. तसेच बाधित कुटुंबांना तातडीचा दिलासा मिळावा यासाठी संबंधित कंपनी, महाराष्ट्र शासन आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका या तिन्ही स्तरांवरून आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात आहे

## शिरूरमध्ये गट सचिवांचा स्नेहमेळावा; सेवानिवृत्तांचा गौरव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर तालुक्यातील गट सचिवांची बैठक, स्नेहभोजन व सेवानिवृत्त गट सचिवांचा सत्कार समारंभ नुकताच गुरुकृपा हॉटेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला तालुक्यातील गट सचिव, सहकारी क्षेत्रातील पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे जिल्ह्याचे उपनिबंधक मा. अरुणरावजी साकोरे होते. यावेळी सेवानिवृत्त गट सचिव दिगंबर लोणकर, महादेव थोरात, संभाजी दोंडे आणि विजय मोकाशी यांचा त्यांच्या उल्लेखनीय सेवाकार्यासाठी शाल, श्रीफळ व

> **गट सचिव हे सहकार चळवळीचा कणा असून शेतकरी, सभासद आणि सहकारी संस्थांमधील महत्त्वाचा दुवा आहेत. त्यांच्या न्याय प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मी यापूर्वीही प्रयत्न केले असून, भविष्यातही आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य कायम राहील. गट सचिवांचे हित जपण्यासाठी आपण नेहमीच त्यांच्या पाठीशी उभे राहू,**
> **- अशोक बाप्पू पवार**
> मा. आमदार
> तथा पुणे जिल्हा बँक संचालक पुणे

> **गट सचिवांमधील एकोपा, समन्वय आणि संघटनात्मक बळ वाढविण्यासाठी अशा स्नेहमेळाव्यांचे विशेष महत्त्व आहे. संघटनेच्या माध्यमातून गट सचिवांचे विविध प्रलंबित प्रश्न शासन व संबंधित विभागाकडे सातत्याने मांडले जातील. सर्व गट सचिवांनी एकजुटीने काम करून सहकार चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.**
> **- राजेंद्र पवार**
> अध्यक्ष सचिव संघटना शिरूर



पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास माजी आमदार तथा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मा.अशोक (बापू) पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. गट सचिवांना पगारवाढ व पगारातील फरक मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेल्या मोलाच्या प्रयत्नांबद्दल त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत कृतज्ञता व्यक्त केली.बैठकीत गट सचिवांच्या विविध प्रशासकीय, संघटनात्मक व प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर स्नेहभोजनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शिरूर तालुक्यातील गट सचिवांनी केले होते.यावेळी बोलताना सचिव संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी, अशा स्नेहमेळाव्यांमुळे गट सचिवांमधील संवाद, स्नेह आणि एकोपा अधिक दृढ होतो. तसेच अनुभवी सहकाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्याची संधी मिळते, असे सांगितले.

## आषाढी वारी चित्ररथाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांच्या वतीने आषाढी वारी सोहळ्यानिमित्त जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष चित्ररथाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले.यावेळी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक तथा सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पीएमपीएमएलचे



संचालक अजय खेडेकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना, सामाजिक संदेश तसेच जनजागृतीपर माहिती वारकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने केंद्रीय संचार ब्यूरोच्या वतीने हा विशेष चित्ररथ तयार करण्यात आला आहे. वारी मार्गावर हा चित्ररथ विविध ठिकाणी जनजागृतीचे कार्य करणार असून, माहितीपर प्रदर्शन, ध्वनी प्रसारण आणि लोककलांच्या माध्यमांतून नागरिकांशी संवाद साधला जाणार आहे.

**उपविभागीय अधिकारी खेड, उपविभाग खेड, राजगुरुनगर यांचे न्यायालयात.**

क्र. आरटीएस/अपील/५५६/२०२५
राजगुरुनगर, दिनांक २२/६/२०२५

### जाहीर नोटीस

**सुमन नितीन चौधरी** व इतर.... अपिलार्थी
**विरूध्द**
**सविता नितीन चौधरी** व इतर..... जाबदेणार

उपरोक्त अपिल अर्जातील जमिन मिळकत मौजे सिध्देगव्हाण, ता. खेड, जि. पुणे येथील जमीन सर्व्हे/गट नं. २६८/१/अ/१ पैकी पो.ख. सह ०२ हे ३० आर या मिळकतीचे संदर्भात ही मंडल अधिकारी, पिंपळगाव तर्फे खेड यानी फेरफार नं १५०६ ही नोंद प्रमाणित करणेच्या निर्णयावर व्यथित होवुन अपिलार्थी यांनी दिलेल्या निर्णयावर व्यथित होवुन अपिलार्थी यांनी दिनांक ०४/०८/२०२५ रोजी विलंब माफीचे अर्जासह अपील दाखल केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी अपीलाची सुनावणीकामी जाबदेणार यांना रितसर नोटीसा पाठविणेत आलेल्या होत्या. परंतु जाब देणार क्र. १) सविता नितीन चौधरी, २) मोनिका नितीन चौधरी, ३) श्रेयश नितीन चौधरी, ४) नीलम संदीप ढवळे हे सुनावणी तारखांना हजर राहीलेले नाहीत व त्यांनी त्यांचा लेखी अथवा तोंडी युक्तीवाद दाखल केलेला नाही. वरील जाब देणार यांचा नवीन पत्ता मिळुन न आल्याने जाहीर नोटीस देणेबाबत अपिलार्थी यांनी विनंती केलेवरुन तसेच सर्व हितसंबंधीत तमाम लोकांस सदरची जाहीर नोटीस देण्यात येत आहे. उपरोक्त अपिल अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वतः अथवा आपले कायदेशीर प्रतिनिधी मार्फत **उपविभागीय अधिकारी खेड, उपविभाग खेड, राजगुरूनगर यांचे कार्यालयात दिनांक २२/७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** कागदोपत्री पुराव्यासह हजर राहावे. सदर दिनांकास व वेळी आपण गैरहजर राहील्यास आपले गैरहजरीत सुनावणीचे कामकाज पुर्ण होवुन आपले काहीएक म्हणणे नसल्याचे ग्राहय धरुन योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपविभागीय अधिकारी खेड,**
**उपविभाग खेड, राजगुरुनगर करिता**

मा. उपविभागीय अधिकारी खेड,
उपविभाग खेड, राजगुरुनगर यांचे निर्देशावरुन

(शिक्का)

# अंगणवाडीचे काम कागदावरच?

## प्रशासनाचा अनागोंदी कारभार उघड!



बाळासाहेब गदादे । राष्ट्र सह्याद्री

* जि.प.ने ४ महिन्यांत काम पूर्ण करण्याचे आदेश दिले
* ग्रामपंचायतीने ठेकेदाराला दिले ९ महिने!
* ६ महिन्यांपेक्षा अधिक काळ उलटला, काम बंदच

**चिचोंडी पाटील :** नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील ग्रामपंचायतीच्या हद्दीतील माणिकनगर येथे जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत मंजूर झालेल्या अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाबाबत गंभीर अनियमितता समोर आली आहे. शासनाने निधी मंजूर करून कामासाठी कार्यारंभ आदेश दिल्यानंतरही सहा महिन्यांहून अधिक काळ उलटला असताना प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उपलब्ध अधिकृत कागदपत्रांनुसार, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अहिल्यानगर यांनी दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी चिचोंडी पाटील ग्रामपंचायतीला सदर कामाचा वर्क ऑर्डर (कार्यारंभ आदेश) दिला होता. या आदेशामध्ये अंगणवाडी इमारतीचे काम चार महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते.

त्यानंतर ग्रामपंचायतीने निविदा प्रक्रिया राबवून १९ जानेवारी २०२६ रोजी ठेकेदाराची नियुक्ती केली. मात्र, आश्चर्याची बाब म्हणजे जिल्हा परिषदेने चार महिन्यांची मुदत निश्चित केलेली असताना ग्रामपंचायतीने ठेकेदाराला तब्बल नऊ महिन्यांची मुदत दिल्याचे कार्यारंभ आदेशातून स्पष्ट होत आहे. यामुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. जिल्हा परिषदेने निश्चित केलेली मुदत ग्रामपंचायतीने कोणत्या अधिकारात वाढवली? मुदत वाढविण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेण्यात आली होती का? जिल्हा परिषदेकडून याबाबत लेखी मंजुरी देण्यात आली होती का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. दरम्यान, जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाने नुकतेच ग्रामपंचायतीला पाठविलेल्या पत्रामध्ये कार्यारंभ आदेशानंतर सहा महिने १५ दिवस उलटूनही प्रत्यक्ष काम सुरू झाले नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पत्रात तातडीने काम सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, अन्यथा विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करून वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, शासनाने या अंगणवाडी इमारतीसाठी सुमारे ९.७५ लाखांचा निधी मंजूर केला आहे. तरीही आजपर्यंत प्रत्यक्ष बांधकाम सुरू झाले नसल्याने लहान बालकांच्या शैक्षणिक व पोषण सुविधांवर परिणाम होत आहे. शासनाच्या निधीचा योग्य वापर न झाल्याने ग्रामस्थांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, शासनाने वेळेत निधी मंजूर करून कामाला प्रशासकीय मान्यता दिली होती. जर संबंधित यंत्रणांनी वेळेत कार्यवाही केली असती, तर आज अंगणवाडीचे बांधकाम पूर्णत्वाच्या टप्प्यात पोहोचले असते. मात्र, प्रशासकीय दिरंगाई, नियोजनाचा अभाव आणि मुदतीतील विसंगतीमुळे हे महत्त्वाचे काम रखडल्याचे दिसून येत आहे. आता या संपूर्ण प्रकरणात वर्क ऑर्डरपासून निविदा प्रक्रिया, मुदतवाढ, काम सुरू न होण्यामागील कारणे आणि जबाबदार अधिकारी किंवा संबंधित घटकांची भूमिका यांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# द•ख•ल

## एस.आय.आर. चे काम जोमाने सुरू



**हातगाव :** केंद्र व राज्य निवडणूक आयोगामार्फत प्राप्त आदेशान्वये सुरू करण्यात आलेल्या मतदार विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम शेवगाव तालुक्यात युद्ध पातळीवर सुरू असल्याबाबतची प्रमुख माहिती तहसीलदार आकाश दहाडदे यांनी आमचे प्रतिनिधीजवळ बोलताना दिली आहे. या बाबत ते म्हणाले की, शेवगाव तालुका हा विस्ताराने मोठा तालुका असून तालुक्यातील ११३ गावात मिळून २ लाख १२ हजार ३१९ एवढ्या मतदारांपैकी १ लाख ९ हजार २११ पुरुष तर १लाख ३ हजार १०२ स्त्री आणि तृतीय पंथी ६ असे मतदार आहेत.त्यामध्येही वय वर्ष ८५ वरील ५ हजार ९८९ एवढे मतदार आहेत .निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सबंध राज्यात मतदार विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम सुरू काण्यात आला असून या कार्यक्रमासाठी तालुक्यात १८ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, २२ सुपरवायझर, १९९ केंद्रस्तरीय अधिकारी व १९९ मदतनीस यांच्या नेमणुका करून निवडणूक आयोगाच्या धोरणानुसार व आदेशानुसार दिलेली सर्व कामे ही येत्या २९ जुलै पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश असल्यामुळे ती सर्व कामे तालुक्यातील सर्व गावात म्हणजे एकूण १९९ मतदान केंद्रात जोमाने सुरू असल्याचेही शेवटी तहसीलदार दहाडदे यांनी सांगितले आहे.

## दादा पाटील राजळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत



**तिसगाव :** दादा पाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालयात प्रथम वर्ष कला व विज्ञान शाखेतील नवप्रविष्ट विद्यार्थ्यांच्या स्वागत व परिचय समारंभाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त राहुल राजळे होते. यावेळी विद्यार्थ्यांनी नियमित महाविद्यालयात उपस्थित राहून शिक्षकांचे मार्गदर्शन, शिष्यवृत्ती, कौशल्यविकास, स्पर्धा परीक्षा, एनईपी-२०२० व इतर शैक्षणिक सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन राहुल राजळे यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमात नवप्रविष्ट विद्यार्थ्यांचे भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमासाठी आ. मोनिकाताई राजळे यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाकरिता कार्यालयीन आधिक्षक विक्रम राजळे, निवृत्त पोलीस उपअधीक्षक गव्हाणे, डॉ. एम एस तांबोळी, डॉ. आर. टी. घोलप, डॉ.साधना म्हस्के, डॉ. जे. एन. नेहूल, प्रा दुर्गा भराट हे सर्व उपस्थित होते.

## अकूंश कासुळे यांची जिल्हा नियोजण समितिवर निवड



**खरवंडी कासार :** पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अंकुश कासुळे यांची जिल्हा नियोजन मंडळाच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कासुळे यांच्या निवडीमुळे तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून तालुक्यातील विकासकामांना गती मिळावी, प्रलंबित प्रश्न मार्गी लागावेत आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचावा, यासाठी कासोळे प्रयत्नशील राहतील, असा विश्वास त्यांच्या समर्थकांनी व्यक्त केला. कासोळे म्हणाले, माझ्यावर विश्वास ठेवून ही जबाबदारी सोपविल्याबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार मोनिका राजळे यांचा ऋणी आहे. त्यांच्या विकासाभिमुख नेतृत्वातून प्रेरणा घेत जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करेन.

## लिंपणगाव सेवा सोसायटी जिल्हा बँक ठराव सर्वानुमते मंजूर



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या लिंपणगाव सेवा संस्थेच्या संचालक मंडळाची बैठक संस्थेच्या कार्यालयात अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. ही बैठक जिल्हा बँक ठरावासाठी संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ टुले यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संचालक मंडळाच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. यावेळी मधुकर होले, लक्ष्मण भोईटे, दादासाहेब कुरुमकर, राजेंद्र कुरुमकर, रवींद्र खळदकर, संभाजी लष्करे, रमेश ओहोळ, संपत होले, अशोक होले, सखाराम निंबाळकर, मोहन कोपनर, ईश्वर रेवगे, कमल भगत, शकुंतला हांडे, सुदाम भगत, नंदकुमार कुरुमकर, दत्तात्रय खळदकर, मोहन ओहोळ, नितीन कुरुमकर आदीसह सर्व संचालक यावेळी उपस्थित होते.

## हर्षद चेमटेचा बोधेगावात आबासाहेब काकडे समूहाकडून सन्मान



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील डोंगराळ परिसरातील हर्षद केशव चेमटे या तरुणाने नुकत्याच थायलंड येथे पार पडलेल्या आशियाई कुस्ती स्पर्धेत ७५ किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांकाचे सुवर्ण पदक मिळवले असून शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या वतीने फार्मसी, आर्ट्स व डी फार्मसीच्या वतीने संस्थेचे प्रमुख अँड. शिवाजीराव काकडे यांच्या शुभ हस्ते सन्मान करण्यात आला आहे. या वेळी बोलताना ॲड. काकडे म्हणाले की, ग्रामीण भागातील असंख्य विद्यार्थी शिक्षण घेत असताना आपले पुढील ध्येय निश्चित करून मार्गक्रमण करत असतात. मात्र त्यावरही ग्रामीण परिसरातील असंख्य तरुण चेमटे सारखे वेग -वेगळ्या क्षेत्रात जाऊन आपले व आपल्या परिसराचे नाव उज्वल करतात ही बाब परिसराच्या दृष्टीने अभिमानाची असल्याचेही शेवटी ॲड. काकडे यांनी सांगितले आहे. या वेळी हर्षद बरोबर त्याचे वडील केशव चेमटे यांचाही सत्कार करण्यात आला असून यावेळी प्रा. एम के फसले, प्रा. डॉ. हेमंत गांगुर्डे, प्रा. राजेश मोकाटे, प्रा.सुनील पडोळे, भाऊसाहेब सातपुते, माणिक गर्जे, राजेंद्र फलके, अनिस सय्यद, वसीम शेख, सिद्धांत, घोरतळे, मच्छिंद्र घोरतळे, भास्कर मासाळकर, आप्पा खिळे यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## मराठी राजभाषा संवर्धन कृती समिती पाथर्डी तालुकाध्यक्षपदी गाडेकर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** महाराष्ट्राची मायबोली मराठी भाषा प्रत्येक घराघरात पोहोचावी, तिचा प्रचार-प्रसार आणि संवर्धन अधिक प्रभावीपणे व्हावे तसेच मराठी भाषेविषयी समाजामध्ये विद्यार्थ्यांमध्ये अभिमान व जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यरत असलेल्या मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानच्या वतीने राज्यभर संघटनात्मक बांधणीला गती देण्यात आली असून, त्याअंतर्गत राज्य, जिल्हा आणि तालुका कृती समित्यांची स्थापना करण्यात येत आहे.

राज्य कृती समिती आणि जिल्हा कृती समितीच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच पाथर्डी तालुका कृती समिती गठित करण्यात आली आहे. त्यामध्ये शिक्षण, सामाजिक कार्य आणि मराठी भाषा संवर्धनासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांची विविध पदांवर सर्वानुमते निवड करण्यात येत आहे.

यामध्ये पाथर्डीतील स्वामी समर्थ विद्यालय येथील कर्तव्यदक्ष, विद्यार्थीप्रिय व आदर्श शिक्षक बंडू गाडेकर यांची तालुकाध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच निंबोडी येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या कार्यप्रवण आदर्श मुख्याध्यापिका मनीषा अंकुश पालवे यांची तालुका कार्याध्यक्षा, त्याच विद्यालयातील कर्तव्यनिष्ठ व विद्यार्थीहित जपणाऱ्या सुरेखा वाघ यांची तालुका उपाध्यक्षा म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी प्रतिष्ठानच्या राज्याध्यक्षा सुलोचना क्षीरसागर यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचे अभिनंदन केले.

## श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी आप्पासाहेब राजळे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**तिसगाव :** पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांची कामधेनू म्हणून ओळख असलेल्या श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, आदिनाथनगर येथे चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवड आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

कारखान्याच्या चेअरमनपदी माजी आ. आप्पासाहेब राजळे यांची, तर व्हा.चेअरमनपदी ज्येष्ठ संचालक बाबासाहेब किलबिले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी आ. मोनिकाताई राजळे, उद्धव वाघ, काकासाहेब शिंदे, राहुल राजळे, श्रीकांत मिसाळ, सुभाष ताठे, सुभाष बुधवंत, रामकिसन काकडे, सुरेश आठरे, यशवंत गवळी, बाळासाहेब गोल्हार, बापूसाहेब पाटेकर, सिंधूताई जायभाये, शेषराव ढाकणे, संदीप लोखंडे, अनिल फलके, नारायण काकडे यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते.

प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद मते आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. उद्धव नाईक यांच्या उपस्थितीत कारखान्याच्या सभागृहात निवड प्रक्रिया पार पडली.

## एकनाथराव ढाकणे पॉलिटेक्निकची उल्लेखनीय कामगिरी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (चडइढए), मुंबई यांच्या शैक्षणिक गुणवत्ता पडताळणी प्रक्रियेमध्ये समाजभूषण एकनाथराव ढाकणे पॉलिटेक्निक, राक्षी, ता. शेवगाव यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध अभियांत्रिकी विभागांसाठी उत्कृष्ट शेरा प्राप्त केला आहे. या यशामुळे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षणाला आणखी एक मानाचा तुरा लाभला आहे.

एमएसबीटीईच्या मॉनिटरिंग अहवालानुसार मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागांना सवोर्त्तम उत्कृष्ट, तर सिव्हिल इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागांना उत्कृष्ठ असा शेरा प्राप्त झाला आहे. अध्यापनाची गुणवत्ता, आधुनिक प्रयोगशाळा, शैक्षणिक नियोजन, विद्यार्थ्यांचा सहभाग, दस्तऐवजीकरण आणि एकूण शैक्षणिक वातावरण या निकषांवर हे मूल्यमापन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण डॉ. एकनाथराव ढाकणे म्हणाले, एमएसबीटीईकडून प्राप्त झालेला हा शेरा संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची पावती आहे. प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश संपादन करता आले. भविष्यात सर्व विभागांना 'एलशश्रश्रशपीं' दर्जा प्राप्त करून देण्यासाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि गुणवत्ता वृद्धीवर अधिक भर दिला जाईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक शिक्षण देऊन सक्षम तंत्रज्ञ घडविण्याचे आमचे ध्येय कायम राहील. या यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत ढाकणे, सचिव जया रहाणे, कोषाध्यक्ष हृषीकेश ढाकणे ,प्रा रियाझखान आत्तार ,प्रा अंबादास डोंगरे , प्रा महेश मरकड , प्रा प्रवीण नागरगोजे यांनी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या जयंतीनिमित्त शहरटाकळी विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शहरटाकळी :** कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शहरटाकळी येथे वक्तृत्व स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्री. रामेश्वर पालवे यांनी परीक्षक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्याचा प्रेरणादायी आढावा घेतला. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण, आत्मविश्वासपूर्ण व प्रभावी वक्तृत्वाचे विशेष कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास योगेश शेळके, दत्ता देहाडराय व दत्तात्रय भालेराव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन अनिता दारकुंडे, हांडे मॅडम व दिपक बोडखे यांनी केले. या उपक्रमाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या चिंतामण मॅडम व पर्यवेक्षक खताळ यांनी आयोजक शिक्षकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे विशेष कौतुक केले. या वक्तृत्व स्पर्धेत एकूण ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे सूत्रसंचालन दिपक बोडखे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन अनिता दारकुंडे यांनी केले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## जातेगाव सोसायटीचा ठराव दत्तात्रय शिवाजी ढोरमले यांच्या बाजूने

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जातेगाव :** अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांमध्ये ठराव मंजूर करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. अशातच जातेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीने महत्त्वाचा निर्णय घेत मतदानासाठी अधिकृत प्रतिनिधी म्हणून दत्तात्रय शिवाजी ढोरमले यांच्या नावाने ठराव बहुमताने मंजूर केला. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या दृष्टीने हा ठराव राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात असून, पारनेर तालुक्यातील सहकार क्षेत्रातील बदलत्या समीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी दत्तात्रय शिवाजी ढोरमले, सुभाष ढोरमले, दिगंबर पोटघन, रघुनाथ पोटघन, वैभव ढोरमले, भाऊसाहेब गायकवाड, छबुबाई ढोरमले व विजया बाळू ढोरमले उपस्थित होते. यावेळी राहुल शिंदे, दत्तानाना पवार, मनोज मुगसे, लहू भालेकर, विठ्ठल पोटघन, संजय गायकवाड, संतोष ढोरमले, सुनिता विठ्ठल पोटघन, गौराम ढोरमले, निलेश पोटघन, जालू पोटघन, सचिन ढोरमले, संजय ढोरमले यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत जिल्हा बँकेच्या निवडणुकीसंदर्भात सविस्तर चर्चा झाल्यानंतर दत्तात्रय शिवाजी ढोरमले यांच्या नावाने अधिकृत प्रतिनिधीचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

# अखेर ९ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अतिक्रमणित जागेची मोजणी पूर्ण!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** ग्रामपंचायत राशीन यांच्या मालकीच्या गट क्र. १४७६ व १४७७ वरील अतिक्रमण प्रकरणात आज दि. १० जुलै २०२६ रोजी महत्त्वाची प्रगती झाली. उप अधीक्षक भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्याने कर्जत टीमने यांच्या ९ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अखेर मोजणी पूर्ण करण्यात यशस्वी ठरले. यामुळे स्थानिक प्रशासनाच्या कारवाईला गती मिळाली असून, अतिक्रमण हटविण्याच्या प्रक्रियेला लवकरच सुरुवात होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

योगेंद्र सांगळे यांनी मुख्यमंत्री सचिवालय व जिल्हाधिकारी कार्यालय, यांच्याशी वेळोवेळी पाठपुरावा केल्यामुळे यश मिळाले आहे अहिल्यानगर येथे दिलेल्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली. आजच्या मोजणी प्रक्रियेत उप अधीक्षक भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी शिरस्तेदार सुनील धामणे, मोजणी अधिकारी प्रशांत थोरात, संजय धनवडे, पठाण, कर्मचारी चतुर, गायकवाड व पंकज निमसे यांनी अथक परिश्रम घेतले. कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक हनुमंत गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते.

ग्रामपंचायत राशीनचे ग्रामविकास अधिकारी रोहिदास कापरे यांनी संपूर्ण जबाबदारी स्वीकारत मोजणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली गट विकास अधिकारी सूर्यवंशी, सहाय्यक गट विकास अधिकारी गार्डे व इतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.




योगेंद्र सांगळे यांनी यावेळी स्पष्ट केले की, इंदिरा आवास, रमाई आवास व प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधलेल्या घरांना कोणताही धक्का न लावता पुढील कार्यवाही करण्यात येईल. लोकांनी कुठल्या ही अफवांवर विश्वास ठेवू नये. ग्रामपंचायत सर्व रहिवाशांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील.

ही मोजणी पूर्ण झाल्याने राशीन परिसरातील रहिवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अतिक्रमण हटवण्याची प्रक्रिया पारदर्शक व कायद्याच्या चौकटीत राहील, असे प्रशासनाने सूचित केले आहे.

राशीन ग्रामपंचायतीचे हे पाऊल स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जागांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहे. पुढील कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

रविवार दि.१२ जुलै २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## खंडाळ्यात मोटार सोबत केबली चोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील खंडाळा परिसरातील शेतकऱ्यांच्या मोटारी, केबल चोरून नेण्याचा प्रकार घडला आहे. प्रताप ढोकचौळे हे त्यांच्या शेतावर सकाळी चक्कर मारायला गेले असता शेतातील सोलरवरील मोटार दिसली नाही तसेच मोटारीचा पाईपही वर काढलेला होता, केबलही त्या ठिकाणी नव्हती त्यावेळी चोरट्यानी केबल चोरून नेल्याची घटना घडली. इतर शेजारी असणारे शेतकरी बालचंद शंकरलाल पुरोहित, म्हसू चंद्रभान ढोकचौळे, बाळासाहेब विठ्ठल ढोकचौळे, दादासाहेब माधव ढोकचौळे व सर्जेराव सुभाष मुंढे यांनी देखील आमच्या काही मोटारी व केबल चोरून नेल्या आहेत. सुमारे ६१ हजार रूपयांच्या केबल, मोटारी चोरून नेल्याचा गुन्हा श्रीरामपूर शहर पोलिसात दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

## कोपरगावच्या मुख्य रस्त्यावर झाड कोसळले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव शहरातील मुख्य रस्त्यावर शनिवारी (दि.११) दुपारी साधारण २ वाजण्याच्या सुमारास एक मोठे लिंबाचे झाड अचानक कोसळून शेजारील दुकानांवर पडले. या घटनेत दुकानाचे नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच आमदार आशुतोष काळे यांनी तातडीने घटनास्थळी मदतीची व्यवस्था करत झाड हटविण्यासाठी दोन क्रेन उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे झाड हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आणि परिसरातील परिस्थिती लवकर नियंत्रणात आणण्यात यश आले.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक व कार्यकर्तेही तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दुकानदारांना मदत करण्याबरोबरच रस्त्यावर पडलेले झाड हटविण्याच्या कामात सहभाग घेतला.

तसेच वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करून वाहतूक कोंडी होऊ नये याची काळजी घेतली. या प्रसंगी नगरसेवक शैलेश साबळे, इम्तियाज अत्तार, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक फकीर कुरेशी, मयूर राऊत, रितेश राऊत यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मदत कार्यामध्ये सहभागी झाले.या घटनेच्या निमित्ताने संकटाच्या प्रसंगी नागरिकांच्या मदतीसाठी तत्परतेने धावून जाण्याची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे नागरिकांनी नमूद केले.

## म्हैसगाव परिसरात बिबट्याचा मुक्त वावर; ग्रामस्थांमध्ये भीती



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील म्हैसगाव परिसरात बिबट्याचा वाढता वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. आतापर्यंत रात्रीच्या वेळी दिसणारा बिबट्या आता भरदिवसाही वावरताना दिसत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी केदारेश्वर मंदिर परिसरातील दाट गवतामधून अचानक बिबट्या बाहेर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. त्या वेळी शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांची ये-जा सुरू होती.

सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या घटनेनंतर नागरिकांनी सकाळी व रात्री बाहेर पडताना अधिक खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, म्हैसगाव-आग्रेवाडी तसेच केदारेश्वर मंदिर परिसरातील अनेक पथदिवे बंद असल्याने रात्री अंधाराचे साम्राज्य पसरते. त्यामुळे बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. यापूर्वीही वन विभागाकडे बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी करण्यात आली होती. काही महिन्यांपूर्वी याच परिसरात विहिरीत पडलेल्या बिबट्याची वन विभागाने सुखरूप सुटका केली होती. मात्र पुन्हा बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. वन विभागाने तातडीने परिसराची पाहणी करून पिंजरा लावावा, तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# कॅन्डीड फार्मासिटिकलला एफडीएचा दणका

## २.४५ कोटींचा साठा जप्त; कंपनीला औषधे बाजारातून परत मागविण्याचे आदेश




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : महाराष्ट्रातील रुग्णांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) Cadila Pharmaceuticals Ltd. विरोधात मोठी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या सुरक्षित अन्न, सुरक्षित औषधे व सुरक्षित महाराष्ट्र मोहिमेअंतर्गत कंपनीच्या Aciloc १५० Plus आणि Aciloc ३०० Plus या औषधांचा तब्बल २ कोटी ४५ लाख ३७ हजार ४९० रुपयांचा साठा विक्री व वितरणासाठी प्रतिबंधित करण्यात आला असून संबंधित औषधे तातडीने बाजारातून परत मागविण्याचे (Recall) आदेशही देण्यात आले आहेत.

एफडीएच्या माहितीनुसार, पुणे येथील ८९.४५ लाख, नागपूर येथील ९८.७१ लाख आणि भिवंडी (ठाणे) येथील ५७.२० लाख रुपयांचा औषधसाठा जप्त करण्यात आला. अमरावती येथे नियमित तपासणीदरम्यान हे प्रकरण उघडकीस आले.

तपासात असे आढळून आले की, पूर्वी Ranitidine या सक्रिय घटकासह विकल्या जाणाऱ्या Aciloc १५० व Aciloc ३०० या औषधांच्या नावाशी साधर्म्य राखत कंपनीने Famotidine हा पूर्णपणे वेगळा सक्रिय घटक असलेली Aciloc १५० Plus आणि Aciloc ३०० Plus ही औषधे बाजारात आणली.

मात्र, नावात केवळ 'Plus' जोडून आणि पूर्वीप्रमाणेच लेबल व पॅकेजिंग वापरल्यामुळे डॉक्टर, औषध विक्रेते आणि रुग्णांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याचे एफडीएने नमूद केले आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हा प्रकार गंभीर मानत एफडीएने संबंधित कंपनीला Aciloc १५०, Aciloc १५० Plus, Aciloc ३०० आणि Aciloc ३०० Plus या सर्व औषधांचा बाजारातील उपलब्ध साठा तात्काळ परत मागविण्याचे आदेश दिले आहेत.

### नागरिक आणि डॉक्टरांना एफडीएचे आवाहन

एफडीएने नागरिक, डॉक्टर आणि औषध विक्रेत्यांना औषधांचे ब्रँड नाव आणि सक्रिय औषधी घटक (Active Ingredient) तपासूनच औषधांचा वापर किंवा वितरण करण्याचे आवाहन केले आहे. तसेच नावात साधर्म्य असलेल्या औषधांबाबत विशेष दक्षता घेण्यास, कोणताही संभ्रम असल्यास डॉक्टर किंवा औषधतज्ज्ञांचा सल्ला घेण्यास आणि संशयास्पद औषधांबाबत तातडीने एफडीएशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० अंतर्गत आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. एफडीए आयुक्त तुकाराम मुंडे यांनी सांगितले की, औषधांच्या नावातील साधर्म्यामुळे चुकीचे औषध रुग्णांपर्यंत पोहोचण्याचा धोका निर्माण होणे ही सार्वजनिक आरोग्यासाठी अत्यंत गंभीर बाब आहे.

औषधांचे ब्रँडिंग, लेबलिंग आणि विपणन करताना नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असून नागरिकांना सुरक्षित औषधे उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## रांजणगाव देशमुख येथे तरुणाला मारहाण

### तिघांवर अँट्रोसिटी दाखल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : कोपरगाव तालुक्यातील रांजणगाव देशमुख येथील सोनवणे वस्तीवर राहणाऱ्या एका २३ वर्षीय तरुणास रस्त्यात अडवून जातीवाचक शिवीगाळ करत लोखंडी पाईपने मारहाण केल्याप्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात तिघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल बाळासाहेब जगताप (वय २३, रा. सोनवणे वस्ती, रांजणगाव देशमुख, ता. कोपरगाव) या तरुणाने शिर्डी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे. अमोल हा शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळ (काकडी) येथील मेघा कंपनीत खाजगी नोकरी करतो.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ जुलै रोजी शेतातील विजेचा खांब पडल्यामुळे अमोलच्या घरात लाईट नव्हती. त्यामुळे ९ जुलै २०२६ रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास तो मोबाईल चार्जिंग करण्यासाठी मोटारसायकलवरून रांजणगाव येथे गेला होता. चार्जिंग करून परत गावाकडून सोनवणे वस्तीकडे जात असताना, स्मशानभूमीजवळ समोरून एका मोटारसायकलवरून प्रसाद भास्कर खालकर, दिलीप नवनाथ खालकर, आणि विलास शिवाजी खालकर (सर्व रा.रांजणगाव देशमुख) हे आले. अमोलच्या मोटारसायकलच्या मागच्या सीटवर लोखंडी पाईपने मारले. अमोलने गाडी वळवून, माझ्या सीटवर पाईप का मारला? मला लागला असता तर? असे विचारले. याचा राग आल्याने दिलीप खालकर याने गाडी थांबवली. प्रसाद खालकर याने खाली उतरून अमोलच्या शर्टची कॉलर धरली आणि अत्यंत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली.

तुला गावात राहायचे आहे का नाही? तुझे मळ्यात एकच महाराचे घर आहे. तुला रात्री घरात घुसून मारून टाकीन. तुझे भाऊबंद आणि महार जातीचे सगळे आले तरी माझे काही करू शकत नाही, अशी धमकी देत त्याला मारहाण व जातीवाचक अपमान केल्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## पुणतांबा-शिर्डी मार्गावरील लुटारू ग्रामस्थांच्या सतर्कतेने जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : पुणतांबा-पिंपळवाडी-शिर्डी मार्गावरील रेल्वे पुलाजवळ वाहनचालकांना अडवून लुटमार करणाऱ्या दोघा संशयितांना वाहनचालक व ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे जेरबंद करण्यात आले. त्यानंतर त्यांना राहाता पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

गेल्या महिनाभरापासून या मार्गावर रात्रीच्या वेळी वाहनचालकांना अडवून मोबाईल, रोख रक्कम हिसकावून मारहाण केल्याच्या घटना घडत होत्या. मात्र अनेकांनी पोलिसांत तक्रार दाखल केली नव्हती. शुक्रवारी रात्री साडेनऊच्या सुमारास एका दुचाकीस्वाराला अडवून त्याचा मोबाईल व रोकड हिसकावण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या वाहनचालकालाही अडविण्याचा प्रयत्न झाला. मात्र पाठीमागून चारचाकी वाहन आल्याने संशयितांनी पळ काढला.

वाहनचालकांनी त्यांचा पाठलाग केला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच रस्त्यालगतचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. ग्रामस्थांच्या मदतीने दोघा संशयितांना पकडून राहाता पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, संशयितांकडील दुचाकीची वायरिंग तोडलेली होती आणि वाहनावर क्रमांक नव्हता. त्यांच्या ताब्यात पिस्तूल असल्याचाही दावा करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास राहाता पोलीस करत असून, फरार झालेल्या अन्य संशयितांचा शोध सुरू आहे.

## जिल्हा नियोजन समितीवर संदेश कार्ले नगर तालुक्यात शिवसेनेला बळकटी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जिल्हा नियोजन समितीवरील नामनिर्देशित सदस्य व विशेष निमंत्रित सदस्यांच्या नुकत्याच झालेल्या नियुक्त्यांमध्ये नगर तालुक्यातील शिवसेना नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीमुळे नगर तालुक्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला बळकटी मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. निवडीनंतर भाजपचे युवा नेते डॉ. सुजय विखे पाटील यांनी कार्ले यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

खंडाळा येथील रहिवासी असलेले संदेश कार्ले यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात शिवसेनेतून केली. ते दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य तसेच नगर पंचायत समितीचे सभापती राहिले आहेत. घोसपुरी पाणीपुरवठा योजनेचे सुमारे दहा वर्षे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी तोट्यातील योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून राज्यस्तरावर आदर्श निर्माण केला होता. नगर तालुक्यात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी करण्यातही कार्ले यांचे मोठे योगदान मानले जाते. तालुकाप्रमुख व उपजिल्हाप्रमुख म्हणून त्यांनी गावागावांत शाखा उभारून पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवली. दरेवाडी व अरणगाव गटाचे प्रतिनिधित्व करताना विविध विकासकामे आणि शासकीय योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास त्यांनी प्राधान्य दिले. गेल्या वर्षी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता.

त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने जिल्हा नियोजन समितीवर संधी दिली आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्ले यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविली जाऊ शकते, अशीही चर्चा आहे. गत विधानसभा निवडणुकीत कार्ले यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत ११ हजारांहून अधिक मते मिळवली होती. त्यांच्या उमेदवारीचा परिणाम पारनेर-नगर मतदारसंघातील निकालावर झाल्याची राजकीय विश्लेषकांची भूमिका आहे. त्यामुळे आगामी काळात नगर तालुक्यातील राजकारणात संदेश कार्ले यांची भूमिका अधिक प्रभावी ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## पाकिस्तानी गँगस्टरच्या जाळ्यावर एटीएसचा प्रहार

### वैजापूरातील युवक ताब्यात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : महाराष्ट्र राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) पाकिस्तानमध्ये बसलेल्या कुख्यात गँगस्टर शहजाद भट्टी याच्याकडून सोशल मीडिया आणि विविध डिजिटल माध्यमांच्या साहाय्याने भारतीय युवकांना कथित राष्ट्रविरोधी कारवायांकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न उधळून लावत राज्यभर एकाचवेळी कारवाई केली आहे. या मोहिमेअंतर्गत शुक्रवारी विविध ठिकाणी छापे टाकून अनेक युवकांना ताब्यात घेण्यात आले.

त्यामध्ये वैजापूर तालुक्यातील खंडाळा जानेफळ शिवावरील परिसरात एका २८ वर्षीय युवकाचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात विशेष चर्चेचा विषय म्हणजे चौकशीच्या कक्षेत आलेला युवक कोणत्याही गुन्हेगारी किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातील नसून अत्यंत सामान्य शेतमजूर कुटुंबातील आहे. युवक अविवाहित असून त्याच्या कुटुंबात आई आणि मोठा भाऊ आहेत. संपूर्ण कुटुंब शेतमजुरी करून उदरनिर्वाह करते. मुलाला अचानक ताब्यात घेतल्यानंतर आईची अवस्था अत्यंत व्यथित झाली असून संपूर्ण कुटुंबाला मोठा मानसिक धक्का बसला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, एटीएसकडून युवकाचा मोबाईल फोन आणि इतर डिजिटल उपकरणांची फॉरेन्सिक तपासणी केली जात आहे. त्याचा कोणत्याही कथित राष्ट्रविरोधी नेटवर्कशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध होता का, याचा तपास सुरू आहे.

आतापर्यंत अशा प्रकारचे सोशल मीडियावरील संशयास्पद नेटवर्क मोठ्या शहरांपुरते किंवा तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्तींपुरते मर्यादित असल्याचे मानले जात होते. मात्र वैजापूर तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील युवकाचे नाव समोर आल्याने ही धारणा बदलताना दिसत आहे. डिजिटल माध्यमांतून पसरविले जाणारे असे जाळे आता ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्याचे संकेत या घटनेतून मिळत आहेत. ही घटना समाजासाठीही गंभीर इशारा मानली जात आहे.

सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी संपर्क, संशयास्पद लिंक, आर्थिक आमिषे किंवा भडकावू संदेश यांपासून प्रत्येक युवकाने सावध राहण्याची गरज आहे. कारण अशा प्रकारच्या कृती केवळ कायद्याने गंभीर गुन्हा ठरत नाहीत, तर संबंधित व्यक्तीचे भविष्य, कुटुंबाची प्रतिष्ठा आणि समाजाचा विश्वास यांवरही दूरगामी परिणाम करू शकतात.

## श्रीरामपूर आजपासून बेमुदत बंद

### आकाश दुबैय्या हत्या प्रकरणी सर्वपक्षीय आक्रमक

#### सूत्रधारांवर कठोर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : हॉटेल लक्ष्मीनारायण अँड लॉजिंगचे मालक आकाश चंद्रशेखर वेंकटरमन दुबैय्या यांच्या निर्घृण हत्येनंतर श्रीरामपूर शहरात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ मर्चंट असोसिएशनच्या पुढाकाराने शनिवारी सर्वपक्षीय निषेध सभा पार पडली. या सभेत रविवार (१२ जुलै)पासून श्रीरामपूर शहर बेमुदत बंद ठेवण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. मुख्य आरोपींसह संपूर्ण कटातील सूत्रधारांना अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

आमदार हेमंत ओगले यांनी शहरातील वाढत्या गुन्हेगारीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत आकाश दुबैय्या हत्या प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याची मागणी केली. तसेच पालकमंत्र्यांसह शिष्टमंडळाने मुख्यमंत्री यांची भेट घेऊन श्रीरामपूरच्या कायदा-सुव्यवस्थेबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी, हे आंदोलन अधिक तीव्र झाले पाहिजे. जनतेच्या एकजुटीच्या रोषामुळे प्रशासन आणि पालकमंत्र्यांनाही श्रीरामपूरमध्ये यावे लागेल, असे सांगत नागरिकांनी शांततेच्या मार्गाने लढा सुरू ठेवण्याचे आवाहन केले. सभेत भाजपचे केतन खरे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील रविवारी सकाळी १० वाजता श्रीरामपूरमध्ये येऊन संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेणार असल्याची माहिती दिली.

यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, नगराध्यक्ष करण ससाणे, माजी नगराध्यक्ष संजय फंड, शिवसेनेचे खोरे मामा, प्रकाश चित्ते, माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे, नगरसेवक श्रीनिवास बिहाणी, भाजपच्या गटनेत्या नगरसेविका वैशाली चव्हाण, भाजपचे शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, सराफ असोसिएशनचे दिलीप नागरे, ज्ञानेश्वर मुरकुटे, मुन्ना झवर, मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण गुलाटी, नगरसेवक आशिष धनवटे, विवेक माटा, राजाभाऊ कापसे, रवींद्र गुलाटी, मार्केट कमिटीचे सभापती सुधीर नवले, नगरसेवक संजय गांगड, लकी सेठी, सुनील गुप्ता, भाजपचे केतन खोरे, राजेंद्र देवकर, सागर भागवत, राजेंद्र अदिक, संजय पांडे, तिलक डुंगरवाल, मनसेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, भिमा बागुल, राजेंद्र सोनवणे, नगरसेवक डॉ. दिलीप शिरसाठ, कामगार नेते नागेश सावंत, सतीश कुंकूलोळ आदींनी वाढत्या गुन्हेगारीविरोधात कठोर आणि प्रभावी कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, श्रीरामपूर बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ड. सुभाष जंगले यांनी या प्रकरणातील आरोपींचे श्रीरामपूर न्यायालयात कोणताही वकील वकीलपत्र स्वीकारणार नसल्याची घोषणा केली.

त्यांच्या या भूमिकेला सभागृहात उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात समर्थन दिले. सभेचे प्रास्ताविक मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण गुलाटी यांनी केले. व्यापारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, नागरिक तसेच सर्वपक्षीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि गुन्हेगारीला कायमचा आळा घालण्यासाठी तातडीने कठोर उपाययोजना करण्याची एकमुखी मागणी सभेत करण्यात आली. आवश्यक असल्यास याच बातमीसाठी ४००-५०० शब्दांची विस्तृत आवृत्ती किंवा पहिल्या पानासाठी अधिक प्रभावी बॅनर मथळाही तयार करून देऊ शकतो.